अहवाल क्रमांक:१३१

पंचायती राज समिती

(२०१०-२०११)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

अकोला, वाशिम व बीड जिल्हा परिषदांच्या
सन २००४-२००५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात

सहावा अहवाल

(सदर अहवाल दिनांक २१ एप्रिल, २०११ रोजी विधानसभेस / विधानपरिषदेस
सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०११

पंचायती राज समिती

(२०१०-२०११)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

अकोला, वाशिम व बीड जिल्हा परिषदांच्या
सन २००४-२००५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात

सहावा अहवाल

पंचायती राज समिती
(२०१०-२०११)

समिती प्रमुख :

१. श्री. बबनराव शिंदे, वि.स.स.

समिती सदस्य :

२. ॲड, के.सी.पाडवी, वि.स.स.

३. श्री. माधवराव पवार, वि.स.स.

४. श्री. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, वि.स.स.

५. श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

६. श्री. दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.

७. श्री. भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

८. श्री. बच्चू उर्फ ओमप्रकाश कडू, वि.स.स.

९. श्री. उदय सामंत, वि.स.स.

१०. श्री. बापुसाहेब पठारे, वि.स.स.

११. श्री. आण्णा बनसोडे, वि.स.स.

१२. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

१३. श्री. खुशाल बोपचे, वि.स.स.

१४. श्री. सुरेश खाडे, वि.स.स

१५. श्री. चंद्रशेखर बावनकुळे, वि.स.स.

१६. श्री. विष्णू सावरा, वि.स.स.

१७. श्री. अनिल भैय्या राठोड, वि.स.स.

१८. श्री. विजयराव औटी, वि.स.स.

१९. श्री. दादाजी भुसे, वि.स.स.

२०. श्री. नितीन भोसले, वि.स.स.

२१. प्रा. सुरेश नवले, वि.प.स.

२२. श्री. विक्रम काळे, वि.प.स.

२३. ॲड उषा दराडे, वि.प.स.

२४. श्री. सय्यद पाशा पटेल, वि.प.स.

२५. श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.

श्री.भा.ना.कांबळे, सह सचिव.

श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव.

श्री.प्र.स.मयेकर, कक्ष अधिकारी.

श्री.सुभाष नलावडे, कक्ष अधिकारी.

पंचायती राज समिती

(२००८-२००९)

समिती प्रमुख :

१. श्री. सुभाष ठाकरे, वि.स.स.

समिती सदस्य :

*२. श्री. राजन पाटील, वि.स.स.

३. श्री. रमेशभाई कदम, वि.स.स.

४. श्री. माणिकराव जगताप, वि.स.स.

५. श्री. संपतराव अवघडे, वि.स.स.

६. श्री. श्रीनिवास देशमुख (गोरठेकर), वि.स.स.

**७. रिक्त

८. श्री. पी.एन.पाटील, वि.स.स.

९. श्री. सुभाष बने, वि.स.स.

१०. श्री. राजेंद्र मुळक, वि.स.स.

११. श्री. पद्माकर वळवी, वि.स.स.

१२. श्री. डी.एस.अहिरे, वि.स.स.

१३. श्री. आशिष जयस्वाल, वि.स.स.

१४. श्री. तुकाराम सुर्वे, वि.स.स

१५. श्री. अण्णासाहेब माने-पाटील, वि.स.स.

१६. श्रीमती अनुसया खेडकर, वि.स.स.

१७. श्री. अतुल देशकर, वि.स.स.

१८. श्री. टी.पी.कांबळे, वि.स.स.

१९. श्री. विष्णू सावरा, वि.स.स.

२०. श्री. हेमंत पटले, वि.स.स.

२१. श्री. राजन तेली, वि.प.स.

२२. श्री. एम.एम.शेख, वि.प.स.

२३. श्री. विक्रम काळे, वि.प.स.

२४. श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

२५. श्री. रामनाथ मोते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

श्री. अनंत कळसे, प्रधान सचिव.

श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव.

श्री. वि.वा.देशमुख, उप सचिव.

श्री. ता.नि.मिसाळ, अवर सचिव.

---

* सन्माननीय सदस्य श्री.नानाभाऊ पंचबुद्धे यांचा मंत्रिमंडळात राज्यमंत्री म्हणून समोवश झालेला असल्यामुळे रिक्त झालेल्या पदावर सन्मानलीय सदस्य श्री.राजन पाटील, वि.स.स. यांची दिनांक २९ जानेवारी, २००९ रोजी नामनियुक्ती करण्यात आली.

** सन्माननीय सदस्य श्री.विजय वडेट्टीवार यांचा मंत्रिमंडळात राज्यमंत्री म्हणून समावेश झालेला असल्यामुळे पद रिक्त.

प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा 'समिती प्रमुख' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन पंचायती राज समितीचा सहावा अहवाल सादर करीत आहे.

सन २०१०-२०११ करिता समिती दिनांक ४ मार्च, २०१० रोजी गठित झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदेच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय व महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

सन २००४-२००५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात समितीने अकोला, वाशिम व बीड या जिल्हा परिषदांची सखोल तपासणी केली.

समितीने अकोला जिल्हा परिषदेस दिनांक २५, २६ व २७ सप्टेंबर, २००८ रोजी भेट देऊन श्री.नितिनकुमार खाडे मुख्य कार्यकारी अधिकारी व श्री.वा.वा.खर्चे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, अकोला जिल्हा परिषद यांची साक्ष घेतली.

समितीने वाशिम जिल्हा परिषदेस दिनांक २०, २१ व २२ ऑक्टोबर, २००८ रोजी भेट देऊन श्रीमती गुंजन किन्नु, मुख्य कार्यकारी अधिकारी व श्रीमती शं.अ.डोंगरे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, वाशिम जिल्हा परिषद यांची साक्ष घेतली.

समितीने बीड जिल्हा परिषदेस दिनांक १८, १९ व २० नोव्हेंबर, २००८ रोजी भेट देऊन श्री.विरेंद्र सिंह, मुख्य कार्यकारी अधिकारी व श्री.डी.डी.पवार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, बीड जिल्हा परिषद यांची साक्ष घेतली.

सन २०१०-२०११ करिता गठीत झालेल्या समितीने अकोला, वाशिम व बीड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या, तसेच साक्षीचे वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्यांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने अनुक्रमे दिनांक २६ ऑक्टोबर, २०१० रोजी जिल्हा परिषद, अकोला संदर्भात, दिनांक २७ ऑक्टोबर, २०१० रोजी जिल्हा परिषद, वाशिम संदर्भात व दिनांक १० नोव्हेंबर, २०१० रोजी जिल्हा परिषद, बीड संदर्भात मंत्रालयीन विभागाच्या सचिवांच्या/प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

(दहा)

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचेवेळी श्री. ठाकरे, सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, श्रीमती शर्वरी गोखले, अतिरिक्त मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री. संजय कुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री.सतिश गवई, प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग, श्रीमती मालिनी शंकर, प्रधान सचिव, पाणीपुरवठा विभाग यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

तसेच जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकरी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने केलेल्या कामकाजाचा संक्षिप्त वृत्तांत अहवालाच्या शेवटी "परिशिष्ट" म्हणून जोडण्यात आला आहे.

वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या अकोला, वाशिम व बीड जिल्हा परिषदेच्या कामकाजांची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्यांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात समाविष्ट केल्या आहेत.

सन २०१०-२०११ साठी गठित झालेल्या समितीने दिनांक १८ एप्रिल, २०११ रोजीच्या बैठकीत अहवाल विचारात घेऊन संमत केला.

विधान भवन :
मुंबई,
दिनांक : २१ एप्रिल, २०११.

बबनराव शिंदे,
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती.

(अकरा)

अनुक्रमणिका

अ.क्र.	प्रकरण क्रमांक	विषय	पृष्ठ क्रमांक
(१)	(२)	(३)	(४)
		प्रकरण एक **अकोला जिल्हा परिषद**	
१	१.१	पंचायत समिती अकोला - सन २००४-२००५ मध्ये जिल्हा परिषदेने मागासवर्गीयांसाठी केलेली तरतुद खर्च न केल्याबाबत.	
		प्रकरण दोन **वाशिम जिल्हा परिषद**	
२	२.१	पंचायत समिती, कारंजा	
		प्रकरण तीन **बीड जिल्हा परिषद**	
३	३.१	पंचायत समिती वडवणी	
	३.२	उस तोड कामगारांच्या मुलांसाठी असलेल्या वस्तीशाळा	
४		**परिशिष्ट** समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त.	

प्रकरण एक

जिल्हा परिषद, अकोला

पंचायत समिती अकोला - सन २००४-२००५ मध्ये जिल्हा परिषदेने मागासवर्गीयांसाठी केलेली तरतुद खर्च न केल्याबाबत.

सन २००४-२००५ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक १ अन्वये जिल्हा परिषद, अकोला यांनी शासनाच्या आदेशानुसार, जिल्हा परिषदांनी आपल्या निर्दिष्ट उत्पन्नाच्या २० टक्के रक्कम मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी खर्च करणे आवश्यक आहे, या आदेशास अनुसरुन जिल्हा परिषदने सन २००४-२००५ मध्ये आपल्या स्वतःच्या उत्पन्नातून मागासवर्गीय कल्याण योजनांसाठी किती रक्कमेची तरतुद केली होती व त्यापैकी प्रत्यक्षात किती रक्कम खर्च करण्यात आली. सन २००४-२००५ मध्ये वरील योजनेअंतर्गत मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी कोणकोणत्या उपाययोजना जिल्हा परिषदेमार्फत हाती घेण्यात आल्या होत्या व त्या प्रत्येक योजनेवर किती रक्कम खर्च करण्यात आली, या प्रत्येक योजनेचा लाभ किती मागासवर्गीय लाभार्थ्यांना झाला या संदर्भातील माहिती विचारली.

उपरोक्त मुद्याबाबत जिल्हा परिषद, अकोलाकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा करण्यात आला होता.

जिल्हा परिषदेने सन २००४-०५ मध्ये आपल्या स्वतःच्या उत्पन्नातून मागासवर्गीय कल्याण योजनांसाठी रुपये २,७०,०५,०००/- इतक्या रक्कमेची तरतूद केली होती व त्यापैकी प्रत्यक्षात रुपये २,६८,११,२२१/- इतकी रक्कम खर्च करण्यात आली.

सन २००४-०५ या वर्षात घेण्यात आलेल्या योजनांचा तपशील दर्शविणारे विवरणपत्र तसेच योजनानिहाय लाभ झालेल्या लाभार्थींची संख्या खालील दर्शविण्यात आलेल्या विवरणपत्रात दिली आहे. त्यानुसार एकूण ५५१८ लाभार्थ्यांना योजनांचा लाभ देण्यात आला आहे.

अ.क्र.	योजनेचे नाव	तरतूद	खर्च	तरतूदीपेक्षा कमी खर्च	लाभार्थी संख्या

१	मागासवर्गीयांचे घरावरील गवती छपरे बदलवून टिनपत्रे पुरविणे	५००००००	५००००००	०	१४६६
२	मागासवर्गीय कास्तकारांना केरोसिन पंप पुरविणे	१००००००	९९९६००	४००	६८
३	मागासवर्गीय कास्तकारांना लोखंडी चाकजोडी पुरविणे	२१०००००	२०९५६००	४४००	४९६
४	मागासवर्गीयांना पिठाची गिरणी पुरविण्याची योजना	८००००००	७९८४४५०	१५५५०	६४३
५	मागासवर्गीय संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या ग्रंथालयास कपाट, टेबल, खुर्ची, बुककेस पुरविणे	८०००००	७९४२९५	५७०५	९५
६	मागासवर्गीय भजनी मंडळास भजनी साहित्य पुरविणे	१००००००	९९९६००	४००	२५५
७	मागासवर्गीय महिलांना पिको मशीन पुरविणे	२०००००	१९७६००	२४००	५०
८	मागासवर्गीयांना लाउडस्पीकर पुरविण्याची योजना	१००००००	९९९४९८	५०२	४७८
९	मागासवर्गीय उमेदवारांना संगणक प्रशिक्षण	५०००००	४९९८००	२००	१०२०
१०	मागासवर्गीय उमेदवारांना वाहनचालक प्रशिक्षण	२५००००	२४९३८०	६२०	७४
११	मागासवर्गीय बँडपथकांना बँड साहित्य पुरविणे	५०००००	४९८२९४	१७०६	२७९
१२	मागासवर्गीयांना कापडयंत्र पुरविणे	१००००००	९९९३५०	६५०	७९
१३	मागासवर्गीय कास्तकारांना विद्युत पंप पुरविणे	५०००००	४९४९१४	५०८६	५३
१४	मागासवर्गीय विद्यार्थी/विद्यार्थीनींना सायकल पुरविणे	२०००००	०	२०००००	०
१५	मागासवर्गीय कास्तकारांना	५००००००	४९९८८४०	११६०	४६२

	एच.डी.पी.ई.पाईप पुरविणे				
१६	अपंगांना आवश्यक कृत्रीम अवयव पुरविणे	४०००००	०	४०००००	०
१७	अभ्यास दौरा	१००००	०	१००००	०
१८	अपंग वधु-वर परिचय मेळावा	२५०००	०	२५०००	०

समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीच्या आधारे समितीने दिनांक २७ सप्टेंबर, २००८ रोजी जिल्हा परिषद, अकोला येथे भेट देवून मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकाऱ्यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीला मागासवर्गीय भजनी मंडळास भजनी साहित्य पुरविणे या योजनेखाली रु. १० लाखाच्या केलेल्या तरतूदीतून रु.९,९९,६००/-एवढी रक्कम भजनी साहित्य खरेदी करण्यासाठी खर्च करण्यात आल्याचे दिसून आले. परंतु, प्रत्येक गावासाठी एकूण किती निधी देण्यात आला व त्यातून कोणकोणते साहित्य खरेदी करण्यात आले. तसेच, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सायकली पुरवीणे यासाठी रु.२,००,०००/-, कृत्रीम अवयव पुरविणे यासाठी रु.४,००,०००/- आणि वधु-वर परिचय मेळावा यासाठी रु.२५,०००/- एवढी केलेली तरतूद अखर्चीत राहील्या प्रकरणी समितीस भेटीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (महिला व बालविकास विभाग) यांच्याकडून समाधानकारक माहिती मिळू शकली नाही. तसेच तालुक्यात ज्या १८ योजना हाती घेण्यात आल्या त्यांची वर्गवारीची मागणी करून ज्या ४ योजनाबाबत समाजकल्याण समितीत एकमत न झाल्याने राबविण्यात आल्या नाहीत त्या कोणत्या गावांतील होत्या याबाबत समितीने विचारणा केली असता, काही गावांत एकमत न झाल्याने योजना राबविता आल्या नाहीत असा खुलासा करण्यात आला त्यावर समितीने ग्रामविकास विभागाच्या प्रतिनिधीचे याबाबत काय मत आहे असे विचारले असता, त्यांनी, समाजकल्याण समितीमध्ये, जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांचे एकमत झाल्याचा उल्लेख एका ठिकाणी करून दुसरीकडे निधी अखचिर्त रहाण्याची कारणे नमुद केल्याबाबत आश्चर्य व्यक्त केले.

उपरोक्त माहितीच्या आधारे समितीने अधिक माहिती घेण्यासाठी खालील मुद्यांची माहिती मागविली.

अकोला जिल्हा परिषदेने मागासवर्गीयांसाठी सायकली पुरविणे, कृत्रिम अवयव, वधु-वर परिचय मेळावा इत्यादीसाठी सन २००४-२००५ मध्ये तरतुद करूनही त्याबाबींवर ती खर्च न होण्याची कारणे काय आहेत व त्यास जबाबदार कोण आहे. तसेच, भजनी मंडळांना साहित्य पुरविणे ही योजना जिल्हा

परिषदेमार्फत राबवीताना सदर, साहित्य खरेदीसाठी मंडळास कीती रक्कम देण्यात आली, तसेच, रक्कम दिलेल्या गावांची तसेच, भजनी मंडळाच्या नावांचा तपशिल समितीने मागितला.

उपरोक्त मुद्यांच्या अनुषंगाने जिल्हा परिषद, अकोला यांच्याकडून खालील माहिती प्राप्त झाली.

सन २००४-२००५ मध्ये मुळ अंदाजपत्रकात मागासवर्गीय विद्यार्थी व विद्यार्थीनींना सायकली पुरविण्यासाठी रु.२ लाख, अपंगांना अवयव पुरविणे याकरीता रु. ४ लाख व अपंगांचा सामुहिक विवाह व अपंग वधुवर परिचय मेळावा या योजनेसाठी प्रत्येकी रु.२५,०००/-एवढी तरतुद करण्यात आली होती. तसेच, मागासवर्गीयांना सायकल पुरविणे व कृत्रिम अवयव पुरविणे या योजनेऐवजी अपंग मागासवर्गीय लाभार्थ्यांना पीठाची गिरणी पुरविण्यासाठी रु. ७,५०,०००/- ची योजना राबविण्यात आली होती.

तथापी, खालील कारणास्तव उपरोक्त रक्कम खर्च करण्यात आली नाही.-

१) सायकल खरेदीसाठी प्रशासकीय व तांत्रिक मंजूरी दिनांक ६ जूलै, २००४ रोजी घेण्यात आली होती. दर कराराची मुदत संपल्यामुळे उद्योग सहसंचालक यांच्याकडे पुढील दरकराराबाबत विचारणा करण्यात आली तथापि, दरकराराबाबत माहिती न मिळाल्याने सायकली खरेदी करता आल्या नाहीत.

२) अपगांना कृत्रिम अवयव व अपंग वधु-वर परिचय मेळावा योजना राबवितांना अपंगांबाबतची परिपूर्ण माहिती उपलब्ध न झाल्यामुळे या योजना राबविता आल्या नाहीत.

तसेच, भजनी मंडळांना साहित्य पुरविणे या योजने अंतर्गत एकूण २५५ भजनी मंडळास भजनी साहित्य पुरविण्यात आले असून प्रत्येक मंडळास (हामोर्नियम, ढग्गा, चाटी, खंजेरी, टाळ) रु.३,९२०/- एवढ्या रकमेचा भजनी संच पुरविण्यात आला.

सचिवांची साक्ष -

सन २००४-२००५ मध्ये जिल्हा परिषदेने मागासवर्गीयांसाठी केलेली तरतूद खर्च न झाल्याप्रकरणी मंत्रालयीन विभागीय सचिवांची साक्ष दिनांक २६ ऑक्टोबर, २०१० रोजी, आयोजित करण्यात आली होती. समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने असे मत व्यक्त केले की, अनुपालन अहवालात अपगांचा सामुहिक विवाह व अपंग वधु-वर परिचय मेळावे या योजनेसाठी प्रत्येकी रु.२५,०००/- तरतुद केली होती. तथापि, या योजना राबविताना अपंगांची परिपूर्ण

माहिती उपलब्ध न झाल्याने, तसेच जिल्ह्यात एकही अपंग व्यक्ती नसल्याने सदर योजनेवर खर्च होवू शकला नाही असे नमूद करण्यात आले आहे व दुसऱ्या बाजूला भजनी मंडळांना साहित्य पुरविणे या योजनेतंर्गत एकूण २५५ भजनी मंडळांना साहित्य पुरविण्यात आले आहे. त्यामध्ये छोट्या छोट्या गावामध्ये चार-चार, पाच-पाच भजनी मंडळे दर्शविण्यात आली आहेत त्या अनुषंगाने सर्व भजनी मंडळांची चौकशी होणे आवश्यक आहे. समितीने पुढे अशी विचारणा केली की, प्रारंभी सामुहीक विवाहासंदर्भात असलेली योजना सभागृहाने बदलली आहे काय, त्यावर ती सभागृहाने बदलून त्यास मान्यता घेतल्याचे सांगण्यात आले. भजनी साहित्य आधी कोणत्या गोडावूनमधे आले, त्याची तपासणी कोणत्या तांत्रिक विभागाने केली अशी समितीने विचारणा केली असता, सदर साहित्याची तपासणी कॉलेज ऑफ इंजिनिअरींगने दिनांक ३० मार्च, २००५ रोजी केलेली असून त्याचा दर्जा उत्तम असल्याचे प्रमाणित केल्याबाबत सांगण्यात आले. समितीने रु.४,०००/- मध्ये एक हामोर्नियमही विकत घेता येत नसतानाही रु. ३,९२०/- एवढ्या अल्प किंमतीस सर्व भजनी साहित्य खरेदी कसे केले असे मत व्यक्त करून पुढे अशी विचारणा केली की, सदर योजनेसाठी जिल्हा परिषदेने किती रक्कमेची तरतुद केली होती. त्यावर असे सांगण्यात आले की, रु. २ कोटी ७६ लाख ७५ हजार एवढी असून ७ हजार लोकसंख्या असलेल्या पारस गावात एकूण ८ संच दिले, सदर साहित्य मे. व्यंकटेश ट्रेडर्स, अकोला यांच्याकडून खरेदी करण्यात आल्याचे व त्यात खंजेरी, ढग्गा, टाळ, चाटी व हामोर्नियम यांचा समावेश असल्याची माहिती समितीस देण्यात आली व पुढे असा खुलासा करण्यात आला की, भजनी साहित्य खरेदीपुर्वी एकूण ७ निविदा प्राप्त झाल्या होत्या, त्यापैकी ३ निविदा अनुक्रमे रु.९,०२४, ४,०२५/-व रु.८,५३१/- एवढ्या रक्कमेच्या होत्या. तथापि, मे. व्यंकटेश ट्रेडर्सची निविदा रु.३,९२०/- ची असून ती सर्वात कमी किमतीची होती त्यावर समितीने अशी भूमिका घेतली की, या पाच वस्तुंचा पुरवठा एवढ्या कमी किमतीत कसा झाला याचा उलघडा होणे आवश्यक आहे. त्यावर मे. व्यंकटेश ट्रेडर्सने पाच वस्तुच्या किमतीची विगतवारी दिली नसल्याचे सांगण्यात आले. त्यावर समितीने असे निदेश दिले की, भजनी वस्तुचा पुरवठा २५५ भजनी मंडळास झाला किंवा कसे याची चौकशी व संचाची पाहणी करून त्याबाबतचा अहवाल समितीस दिनांक १० नोव्हेंबर, २०१० पुर्वी सादर करावा. त्या अनुषंगाने भजनी साहित्य वितरीत केलेल्या २५५ भजनी मंडळांपैकी फक्त १४ भजनी मंडळांना दिलेल्या भजनी साहित्याची तपासणी केल्याचे नमुद करून. खानापूर व भंडारज (ता.पातूर) येथील अनुक्रमे रामचंद्र नारायण डहाके व भिमराव जयराम तायडे या भजनी मंडळास दिलेल्या खंजेरी व चाटीवरील चामडे

तुटल्याचे, व्याळा (ता.बाळापूर) येथील अनिल सुखदेव दामोदर व पारस (ता.बाळापूर) येथील अनुक्रमे नारायण बागाजी खंडारे व संतोष रामदास साठे या भजनी मंडळांना दिलेल्या खंजेरीचे चामडे तुटल्याचे, महादेव मानाजी तायडे यांना दिलेला डग्गा दुरुस्तीला दिल्याचे तसेच त्यांना खंजेरी अद्याप मिळाली नसल्याचे समितीस दिनांक ७ डिसेंबर, २०१० रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

अभिप्राय व शिफारशी -

जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या एकूण माहितीवरून असे दिसून आले की, जिल्हा परिषद, अकोला यांनी सन २००४-०५ मध्ये मागसवर्गीय कल्याण योजनासाठी रुपये २,७४,८५,०००/- इतक्या रक्कमेची तरतूद केली होती व त्यातून एकूण १८ प्रकारच्या विविध योजनावर एकूण २,६८,११,२२१/- एवढी रक्कम खर्च केली परंतु, जिल्हा परिषदेमार्फत मागासवर्गीय विद्यार्थी / विद्यार्थीनीना सायकल पुरविणे, अपंगांना आवश्यक कृत्रीम अवयव पुरविणे तसेच अपंग वधु-वर परिचय मेळावा या योजनेसाठी करण्यात आलेली तरतूद खर्च करण्यात आली नाही. पर्यायाने सदर योजनेसाठी पैशांची तरतूद करण्यात येवूनही योजना राबविण्यात आली नाही. यावरून जिल्हा परिषद, अकोला ही मागासवर्गीयांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची अंमलबजावणी करण्यात उदासीन असल्याचे दिसून येते व त्याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करते.

जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात आलेल्या भजनी मंडळाला साहित्य पुरविणे या योजनेसंदर्भात प्राप्त झालेल्या एकूण माहितीवरून प्रामुख्याने असे दिसून आले की, सदर योजनेसाठी मूळ तरतूद दहा लाख रुपये करण्यात आली व खर्च रूपये ९,९९,६००/- एवढा करण्यात आल्याचे लेखी माहितीत नमूद करणे व साक्षीच्या वेळी सदर योजनेसाठी एकूण २,७६,७५,०००/- एवढी तरतूद केल्याचे सांगणे तसेच भजनी मंडळाना पुरविण्यात अलेल्या साहित्याची खरेदीही फारच कमी किंमतीत करण्यात आल्याचे आढळून येणे तसेच सदर साहित्याचे वाटप करताना एका-एका गावात दोन पेक्षा अधिक भजनी मंडळांना साहित्याचे वाटप केल्याचे आढळून आले त्यामुळे या संपूर्ण प्रकरणी काही तरी मोठा गैरव्यवहार झाल्याचे दिसून येत आहे. वास्तविक पहाता, एका छोट्या गावात एका पेक्षा अधिक भजनी मंडळे अस्तित्वात असण्याची शक्यता फारच कमी असून सदर साहित्याचे वाटप कागदोपत्री दर्शवून निधीचा अपहार करण्यात आल्याचे या सर्व प्रकरणावरून दिसून येते. तसेच समितीने दिलेल्या निदेशानुसार साहित्याचे वाटप करण्यात आलेल्या एकूण २५५ भजनी मंडळांना साहित्याचा पुरवठा करण्यात आला किंवा नाही तसेच त्यांना पुरविण्यात आलेल्या साहित्याची तपासणी करून त्याबाबतचा

संपूर्ण अहवाल समितीला अद्यापर्यंत देण्यात आलेला नाही. यावरून समितीने दिलेल्या निदेशाचे पालन संबंधिताकडून करण्यात येत नसल्याचे दिसून येते.

उपरोक्त **योजनेसंदर्भात समितीने निदेश देवूनही समितीला संपूर्ण प्रकरणाची माहिती देण्यात टाळाटाळ करण्यात येत आहे. यावरून सदर योजनेत मोठ्या प्रमाणात अनियमितता झाली असून ती लपवण्याचा प्रयत्न जिल्हा परिषद प्रशासनाकडून करण्यात येत आहे. वास्तविक पहाता जिल्हा परिषदेच्या स्वत:च्या उत्पन्नातून मागासवर्गीय लोकांच्या कल्याणासाठी एकूण उत्पन्नाच्या २० टक्के रकमेच्या केलेल्या तरतूदीमधून जिल्ह्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या लोकांच्या वैयक्तीक व सामुहिक विकास व कल्याणासाठी खर्च करणे अपेक्षित असून त्याबाबत शासनाचे स्पष्ट आदेश आहेत, असे आदेश असतानाही जिल्ह्यातील २५५ भजनी मंडळांना साहित्य देण्यासाठी जी रक्कम खर्च करण्यात आली आहे ती उपरोक्त प्रवर्गातील लोकांच्या भजनी मंडळासाठी खर्च झाली आहे किंवा नाही याबद्दल समिती साशंक आहे. सबब, याप्रकरणी सविस्तर चौकशी करून सदर चौकशीत जे दोषी आढळून येतील त्यांच्यावर योग्य ती तात्काळ कारवाई करावी व त्याबाबतची माहिती समितीला ३ महिन्यात पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

प्रक्ररण दोन

वाशिम, जिल्हा परिषद

२.१ पंचायत समिती, कारंजा

पंचायती राज समितीने वाशिम जिल्हा परिषदेच्या सन २००४-२००५ च्या वार्षिक प्रशासन अहवालावरील कारंजा पंचायत समितीच्या प्रश्नावली क्र.२ बाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद वाशिम यांच्याकडून खालील मुद्यांची माहिती मागविली.

सन २००४-०५ या अहवाल वर्षात पंचायत समिती क्षेत्रात जवाहर विहिर योजना कार्यक्रम, आश्वासित रोजगार योजना, संपुर्ण ग्रामीण रोजगार योजना, दलित वस्ती सुधार योजना, स्थानिक विकास कार्यक्रम (खासदार/आमदार), डोंगरी विकास कार्यक्रम, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा निधी व इतर योजने खाली कोणकोणती कामे सुरु करण्यात आली, त्यापैकी किती व कोणकोणती कामे पूर्ण झ ाली, किती कामे अपुर्ण आहेत, व त्याची कारणे काय, अपुर्ण कामाची सद्यःस्थिती काय आहे?

उपरोक्त प्रश्नावली क्र.२ बाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खालील प्रमाणे समितीस लेखी माहिती कळविली

सन २००४-०५ या अहवाल वर्षात पंचायत समिती क्षेत्रात खालील योजने अंतर्गत एकूण १२ कामे सूरु करण्यात आली व त्या कामांची सद्यःस्थिती कामनिहाय व योजना निहाय खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	योजनेचे नाव	घेण्यात आलेली कामे	पुर्ण कामे	अपूर्ण/प्रगती पथावर असलेली कामे	अपूर्ण असल्याची कारणे
१.	जवाहर विहिर योजना कार्यक्रम	१२९	४४	६५	सदर यादीस २४/३/०७ अन्वये स्थगनादेश प्राप्त झाल्यामुळे
२.	संपुर्ण ग्रामिण रोजगार योजना अ) ३०% पं. स.स्तर ब) २०% जि.प.स्तर क) वैयक्तिक लाभ २२.५०% ३०%पं. स.स्तर २०%जि.प.स्तर उपअभियंता ल.सि.उप विभाग ड) ३०% पं.स.स्तर पं.स.स्तर (जलसंधारण) इ)२०%जि.प.स्तर (जलसंधारण) फ) ५०% ग्रा.पं.स्तर	३५ १५ १२९ ७८ ४८ २६ ४९३	३३ १५ १२९ ७८ ४७ १९ ४३८	२ (रद्द) -- -- -- १ (रद्द) ७ (रद्द) ५५ (रद्द)	दान पत्राअभावी कास्तकाराने काम करु न दिल्यामुळे
३.	द.व.सु.योजना	१२	९	३	सदर कामे पुर्ण करण्याबाबत सचिवास वारंवार तोंडी तसेच लेखी सुचना देण्यात आल्या आहेत.
४.	स्वर्ण ज.ग्रा.स्व.रो.यो.	१	१	०	
५.	स्था.वि.कार्य. व डोंगरी वि.कार्य	--	--	--	ही कामे हाती घेण्यात आली नाहीत.

जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे दिनांक २१ ऑक्टोबर, २००८ रोजी समितीने, पंचायत समिती, कारंजा येथे भेट देवून मुख्य कार्यकारी अधिकारी यांची व इतर संबंधित अधिकाऱ्यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने खालील मुद्यांबाबत माहिती घेतली.

साक्षीच्या वेळी पंचायत समिती अंतर्गत जवाहर विहिर योजनेची ६५ कामे अपूर्ण होती. ती कोणत्या वर्षातील असून अपूर्ण राहण्याची कारणे काय आहेत, असे समितीने विचारले असता, गट विकास अधिकारी, वाशिम यांनी, जवाहर विहिर योजनेची एकूण १२९ कामे हाती घेण्यात आली. त्यापैकी, ४४ कामे पूर्ण व ६५ कामे अपूर्ण असल्याची, तथापि सदर यादीस दि.२४ मार्च, २००७ रोजी स्थगनादेश मिळाल्याने, ती पूर्ण करता आली नाहीत व जेवढी कामे झाली तेवढ्या कामाचे मुल्यांकन करुन लाभार्थ्यांना पैसे चुकते करण्यात आल्याची माहिती समितीस भेटीच्या वेळी दिली. समितीने सन २००४-०५ मधील अपूर्ण कामांना स्थगिती कोणी दिली, अशी भेटीच्या वेळी विचारणा केली असता, त्याचा खुलासा समितीस भेटीच्या वेळी प्राप्त झाला नाही. समितीने संपूर्ण ग्रामिण रोजगार योजनेसंदर्भात माहिती मागितली असता गट विकास अधिकाऱ्यांनी सदर योजनेतील ३०% पंचायत समितीस्तरावरील ३५ कामांपैकी ३३ कामे पूर्ण असून दोन कामे दानपत्राअभावी अपूर्ण असल्याची माहिती समितीस दिली. समितीने पुढे ५०% ग्रामपंचायत स्तरावरील रद्द केलेली ५५ कामे कोणती असून ती रद्द करण्याची कारणे काय आहेत, अशी गट विकास अधिकाऱ्यांकडे विचारणा केली असता, गट विकास अधिकाऱ्यांनी सदर कामाची ३८ गावांची यादी असून त्यात नदीवर घाट बांधणे, ग्रामपंचायत भवन बं ाधणे या कामांचा समावेश असल्याची माहिती समितीस दिली. त्यावर समितीने कामाचे नाव, गाव, स्वरुप हे अपूर्ण रहाण्याच्या व रद्द करण्याच्या कारणांसह यादीची मागणी केली असता, उप अभियंत्यानी केलेल्या खुलाशाच्या वेळी डी.आर.डी.ए.मध्ये प्रकल्प आराखडा तयार करुन त्यास मान्यता घेण्यात आली होती. तथापि, निधीच्या अभावी ती रद्द करण्यात आली, अशी समितीस साक्षीच्या वेळी माहिती दिली.

समितीने पुढे दलित वस्ती सुधार योजनेमध्ये तीन कामे अपूर्ण राहिल्याबाबत विचारणा केली असता, गट विकास अधिकाऱ्यांनी सदर कामे सन २००४-०५ या वर्षी सुरु झालेली असून, ती प्रगतीपथावर असल्याची माहिती समितीस साक्षीच्या वेळी दिली. शेवटी समितीने निधी उपलब्ध असूनही कामे अपूर्ण राहिल्याप्रकरणी संबंधितास कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात यावी असे निदेश मुख्य कार्यकारी अधिकारी यांस दिले.

समितीने कारंजा पंचायत समितीस दिलेल्या भेटीच्या वेळी घेतलेल्या साक्षीच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, वाशिम यांच्याकडून केलेल्या कार्यवाहीची खालील प्रमाणे लेखी माहिती समितीस प्राप्त झाली.

लघु सिंचन उप विभाग, जिल्हा परिषद, कारंजा अतंर्गत सन २००४-०५ मध्ये एकूण १२९ विहिरी मंजूर होत्या. विहिरीची कामे खालील कारणास्तव अपूर्ण होती.

१. सन २००४-०५ मधील लाभार्थींच्या निवडीस मा.पालक मंत्री यांनी दि. २९/२/२००६ रोजी अंतिम मंजुरी प्रदान केली आहे.

२. सदर वर्षातील जवाहर सिंचन विहिरींना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद वाशिम यांचे पत्र क्र.ल.सिवी/जी/२१७६/०६,दि.१०/८/२००६ नूसार प्रशासकीय मंजूरी मिळाली.

३. सदर सन २००४-०५ वर्षातील जवाहर सिंचन विहिरींच्या महाराष्ट्र शासन नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई जाविका /२००६ /प्र.३३४ /रो.ह.यो., दि.२२/८/२००६ व शासन निर्णय क्र. जाविका/ ०६/३३४/ रो.ह.यो., दि.१९/९/२००६ अन्वये यादीस स्थगिती देण्यात आली.

४. सन २००४-०५ या वर्षातील जवाहर सिंचन विहिरीवरील स्थगनादेश क्र. जाविका/२००७/प्रक.११८/रो.ह.यो.-११/नियोजन विभाग (रो.ह.यो.) मंत्रालय, मुंबई, दि.२४/३/२००७ अन्वये स्थगिती उठविण्यात आली, स्थगिती उठविल्यानंतर कागदपत्राची पुर्तता करुन पत्र क्र. २९२, दि.३/७/२००७ व पत्र क्र.५५५/६/८/२००७ अन्वये तांत्रिक मंजूरीसाठी विभागीय कार्यालयात अंदाजपत्रके सादर करण्यात आली. त्यानंतर दि.९/८/२००७ रोजी अंदाजपत्रकास तांत्रिक मंजूरी प्राप्त झाली.

५. सन २००४-०५ या वर्षातील जवाहर सिंचन विहिरींना सन २००७-०८ या वर्षात दि.१०/८/२००७ रोजी अनुदान प्राप्त झाले.

पंचायती राज समितीच्या भेटीच्या वेळी ६५ विहिरी अपूर्ण होत्या त्यापैकी सद्यःस्थितीत ४८ विहिरींचे काम पूर्ण व ३ विहिरींची कामे ७५% पूर्ण झाली. ५ विहिरींची नस्ती गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कारंजा यांच्याकडून अप्राप्त असून उर्वरित ९ विहिरींची कामे पूर्ण करण्याकरिता

संबंधित लाभार्थ्यांना पत्र क्र. १७४,दि.१३/५/२००८ अन्वये व पत्र क्र.५९, दि.९/२/२००९ अन्वये कळविण्यात आले आहे.

निवड यादीस स्थगनादेश महाराष्ट्र शासन नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई जाविका/२००१/प्र.३३४/ रो.हो.यो.-१, दि.२२/८/२००६ अन्वये व शासन निर्णय क्रमांक जाविका/०६/ ३३४/ रो.ह.यो.-१, दि.१९/९/२००६ अन्वये स्थगिती देण्यात आली.

समितीने पंचायत समिती कारंजा येथे दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने दिनांक २७ ऑक्टोबर, २०१० रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने खालील मुद्यांची माहिती मागितली.

१. जवाहार विहिरींच्या ६५ कामांस कोणी स्थगन आदेश दिले आहेत, व त्याची कारणे काय आहेत,

२. सदर जवाहर विहिरीच्या कामांवर सन २००४ पासून किती रक्कम खर्च करण्यात आली आहे,

३. अर्धवट काम राहिल्याने त्याचा लाभ लाभार्थ्यांना मिळत नाही त्यामुळे शासनाच्या निधीचा अपव्यय होतो. ही बाब लक्षात घेता भविष्यात अशा प्रकारे निधीचा अपव्यय होणार नाही याबाबत विभागामार्फत कोणती दक्षता घेतली आहे वा घेण्यात येणार आहे.

<u>वरील मुद्यांच्या संदर्भात नियोजन विभागाकडून खालील लेखी माहिती समितीस प्राप्त झाली.</u>

१. वाशिम जिल्ह्यातील सन २००४-२००५ मध्ये मंजूर जवाहर विहिर लक्षांकानुसार मा. पालकमंत्री, वाशिम जिल्हा यांनी मंजूरी दिलेल्या यादीतील लाभार्थ्यांची निवड नियमबाह्य व निकष डावलून केल्याने त्यास स्थगिती देण्याबाबत मा. श्री.राजेंद्र पाटणी, विधानसभा सदस्य (तत्कालीन) व ॲड.दिलीप सरनाईक, अध्यक्ष, वाशिम जिल्हा काँग्रेस कमिटी, वाशिम यांनी मा. मुख्यमंत्री यांना विनंती केली त्यावर मा. मुख्यमंत्री यांनी स्थगिती द्यावी असे आदेशित केल्याने संपूर्ण वाशिम जिल्ह्यातील जवाहर विहिर निविडीच्या यादीस मा. मुख्यमंत्र्यांच्या आदेशाप्रमाणे स्थगिती देण्यात येत आहे. अशा आशयाचे अवर सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांच्या शासन पत्र क्र.-जविका-२००६/प्र.क्र.३३४/रोहयो-१/दि.१९ सप्टेंबर, २००६ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा

परिषद, वाशिम यांना कळविण्यात आले. त्यानुसार कारंजा तालुक्यातील सन २००४-०५ मध्ये एकूण १२९ मंजूर लाभार्थ्यांना निवडीच्या यादीस स्थगिती देण्यात आली होती. वाशिम जिल्ह्यातील जवाहर विहिर लाभार्थी निवडीच्या यादीत शासन पत्र क्र.जविका-२००७/प्र.क्र.११८/रोहयो-२२/दि.२४ मार्च, २००७ द्वारे उपरोक्त पत्रान्वये देण्यात आलेली स्थगिती उठविण्यात आली. दिनांक २१/१०/२००८ रोजी पंचायती राज समितीने दिलेल्या भेटीच्यावेळी एकूण १२९ जवाहर विहिरींपैकी ६५ विहिरी अपूर्ण होत्या.

२. सदर जवाहर विहिरींच्या कामावर माहे मार्च, २००९ पर्यंत अपूर्ण ६५ विहिरींवर रु. २६,४६,१५५/- एवढा खर्च झाला.

३. शासनाने कारंजा तालुक्यातील सन २००४-०५ मध्ये मंजूर केलेल्या जवाहर विहिरी लाभार्थी यादीनुसार एकूण १२९ विहिरींपैकी दिनांक २१/१०/२००८ पर्यंत ६४ विहिरी व त्यानंतर मार्च्, २००९ पर्यंत ३८ विहिरी अशा एकूण १०२ विहिरी आर्थिकदृष्ट्या व भौतिकदृष्ट्या पूर्ण करून घेण्यात आल्या आहेत. उर्वरित २७ विहिरींपैकी ४ विहिरी भौतिक दृष्ट्यापूर्ण झाल्या आहेत व २३ विहिरी पूर्ण होण्याकरिता लाभार्थींना प्रोत्साहित करण्यात येत आहे.

विभागीय सचिवांची साक्ष :

दिनांक २७ ऑक्टोबर, २०१० रोजीच्या मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या आयोजित साक्षीच्या वेळी, समितीने कारंजा पंचायत समिती अंतर्गत जवाहर विहिर योजनेची ६५ कामे अपूर्ण आहेत असे उपरोक्त लेखी माहिती म्हटले आहे. अपूर्ण कामे कोणत्या वर्षातील आहेत आणि ती अपूर्ण राहण्याची कारणे काय आहेत अशी समितीने विचारणा केली असता, जवाहर विहिरीची एकूण १२९ कामे होती, त्यापैकी ६५ कामे अपूर्ण आहेत. अपूर्ण कामाच्या यादीस २४/३/२००७ रोजी स्थगनादेश मिळाल्यामुळे अपूर्ण विहीरींच्या झालेल्या कामाचे मुल्यांकन करुन संबंधितांस पैसे देण्यात आलेले आहेत असे तेथील गट विकास अधिकाऱ्यांनी भेटीच्या वेळी उत्तर दिले होते. VKRK विहिरींच्या कामांची सद्यस्थिती काय आहे अशी समितीने विचारणा केली असता सन २००४-०५ मधील लाभार्थींच्या निवडीस मा. पालकमंत्री मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, वाशिम यांचे पत्र क्र.ल.सी.वी./जी/२१७६/०६ दि.१०/८/०६ नुसार प्रशासकीय मंजूरी मिळाली. सन २००४-०५ वर्षातील सदर जवाहर सिंचन विहिरीला महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग मंत्रालय, मुंबई जाविका २००६/प्र.३३४/रोहयो/दि.२२/०८/२००६ व शासन

निर्णय क्र.जाविक/०६/३३४/रोहयो दि.१९/०९/२००६ अन्वये स्थगिती देण्यात आली होती. तसेच पंचायती राज समितीच्या भेटीच्या वेळी ६५ विहिरी अपूर्ण होत्या त्यापैकी सद्य:स्थितीत ४८ विहिरीचे काम पुर्ण व ०३ विहिरीची कामे ७५% पुर्ण झाली. ०५ विहिरीची नस्ती गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कारंजा यांच्याकडून अप्राप्त असून उर्वरित ९ विहिरींची कामे पूर्ण करण्याकरिता संबंधित लाभार्थ्यांना पत्र क्र.१७४/दि.१३/५/२००८ व ५९ विहिरीची कामे पूर्ण करण्याकरिता संबंधित लाभार्थ्यांना पत्र क्र. १७४/दि.१३/५/२००८ अन्वये व पत्र क्रमांक ५९/दि.९/२/२००९ अन्वये कळविण्यात आले आहे. सन २००७ पासून त्या विहिरींचे सुरु असलेले बांधकाम आता पूर्ण होत आहे. व सन २०१० मध्ये फक्त २३ विहिरींचे बं ाधकाम अपूर्ण आहे आणि जास्तीत जास्त ज्या विहिरींच्या बांधकामांना जलद गतीने सुरुवात होते, त्यांना ते काम विहित मुदतीमध्ये पूर्ण करण्याकरिता प्रोत्साहन निधी देण्याचीही योजना आहे. अशी माहिती सामाजिक न्याय विभागाच्या सचिवांनी साक्षीच्या वेळी समितीला दिली.

विहिरींच्या बांधकामाकरिता यापूर्वी निधी अपुरा पडत होता, त्यावेळी विहिरींची कामे अपूर्ण राहत होती. आता प्रत्येकी एका विहिरीकरिता जवळ जवळ एक लाख रुपयांचे अनुदान शासनाने जाहीर केलेले आहे. तरीही आता काही प्रमाणामध्ये विहिरीची बांधकामे अपूर्ण राहण्याची करणे काय आहेत, असे समितीने विचारले असता, ज्यावेळी या विहिरींच्या कामांना स्थगिती दिली होती, त्यावेळी विहिरींच्या बांधकामाकरिता प्रत्यक्ष येणारा खर्च लक्षात घेता शासनाने विहिरींच्या बांधकामाच्या खर्चाची मर्यादा वाढवून जवळ जवळ एक लाख रुपये केलेली आहे. त्यामुळे आता जास्तीत जास्त अपूर्ण विहिरींचे बांधकाम पूर्ण करण्यात आलेले आहे. आतापर्यंत फक्त २३ विहिरींचे बांधकाम पूर्ण करणे बाकी आहे. तेही त्याकरिता विहित निधी मिळाल्यानंतर लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल. असे साक्षीच्या वेळी विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

या विहिरींच्या बांधकामाच्या निधी वाटपामध्ये अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार केलेला आहे. लाभार्थ्यांची नावे निकषानुसार काढलेली नसून लाभार्थ्यांची यादी करीत असताना निकष डावलले गेलेले आहेत असे समितीने म्हटले असता, सामाजिक न्याय विभागाच्या सचिवांनी, सदर यादीस स्थगिती आदेश मिळालेला होता. त्यानंतर त्यामधील लाभर्थ्यांना योग्य ते निकष लावून त्यामधील नावे बदलून जे लाभार्थी योग्य निकषात बसत होते, त्यांचीच नावे यादीत समाविष्ट करण्यात आली असा समितीस साक्षीच्या वेळी खुलासा केला.

समितीने साक्षीच्या वेळी ज्या विहिरींच्या लाभार्थ्यांना नावांची यादी चुकलेली होती. ती यादी लाभार्थ्यांचे निकष आणि नियम डालवून बनविलेली होती. त्यानंतर जी यादी बनविण्यात आली, त्यामध्ये लाभार्थ्यांची नावे बदलण्यात आली की, लाभार्थ्यांचे निकष बदलण्यात आले. समितीने विचारलेल्या सूचक प्रश्नाला उत्तर देताना विभागीय सचिवांनी मागाहून बनविण्यात आलेल्या लाभार्थ्यांना यादीमध्ये निकषानुसार जे लाभार्थी बसत होते, त्यांचीच नावे ठेवण्यात आली, उर्वरित लाभार्थ्यांची नावे वगळण्यात आलेली आहेत असे साक्षीच्या वेळी सांगितले.

अभिप्राय व शिफारशी :

पंचायती राज समितीने सन २००४-०५ च्या वषिर्क प्रशासन अहवालाच्या संदर्भात प्रश्नावली क्र.२ बाबत माहिती घेण्यासाठी कारंजा पंचायत समितीस दिनांक २१ ऑक्टोबर, २००८ रोजी भेट देवून तेथील अधिकाऱ्यांच्या घेतलेल्या साक्षीच्या वेळी जवाहर विहिरीच्या १२९ कामांपैकी ६५ अपूर्ण कामास स्थगनादेश कोणी व केव्हा दिले याबाबत पंचायत समितीचे गट विकास अधिकारी खुलासा करु शकले नाहीत.

समितीस संपूर्ण ग्रामिण रोजगार योजने अंतर्गत ३०% पंचायत समिती स्तरावरील हाती घेतलेल्या ३५ कामांपैकी ३३ कामे पूर्ण व २ कामे दानपत्राअभावी अपूर्ण, तसेच ५०% ग्रामपंचायत स्तरावरील ३८ गावांसाठी नदीवर घाट बांधणे व ग्रामपंचायत भवन बांधणे अशी असुन, त्यास डी.आर.डी.ए. अंतर्गत प्रकल्प आराखडा तयार करुन मान्यता घेण्यात आली. तथापि, निधी अभावी ती रद्द झाल्याची माहिती समितीस साक्षीच्या वेळी प्राप्त झाली.

सदर विहिरीच्या बांधकाम निधी वाटपात भ्रष्टाचार झाल्याचे समितीस भेटीच्या वेळी आढळून आले. १२९ लाभार्थ्यांची तयार केलेली यादी ही निकष विचारात न घेता तयार करण्यात आली होती म्हणून त्यात भ्रष्टाचार झाल्याने सदर यादीस दिनांक १९/९/२००६ रोजी नियोजन विभागाकडून स्थगिती देण्यात आलेली होती नंतर दिनांक २४ मार्च, २००७ रोजीच्या रोजगार हमी योजना विभागाच्या पत्रान्वये स्थगिती उठविण्यात आली.

भेटीच्या वेळी अपूर्ण ६५ विहिरींपैकी २३ विहिरींची कामे अपूर्ण असल्याची माहिती समितीस साक्षीच्या वेळी विभागीय प्रतिनिधींनी दिली आहे व सदर काम निधीच्या अभावाने प्रलंबित असल्याचेही समितीस सांगण्यात आले. तसेच स्थगितीच्या वेळी विहिर बांधकामासाठी येणारा खर्च लक्षात घेता खर्चाची मर्यादा १ लाख रुपयांपर्यंत वाढवली असल्याने जास्तीत जास्त विहिरी बांधून पूर्ण झालेली

असून फक्त २३ बांधकामे बाकी असल्याची माहिती समितीस देण्यात आली. तसेच नव्याने बनविण्यात आलेली यादी निकषानुसार असून, उर्वरित लाभार्थींची नावे वगळण्यात आली होती.

या **प्रकरणी सदर विहिर बांधकामातील निधी वाटपात भ्रष्टाचार होवून पूर्वीची लाभार्थ्यांची यादी लाभार्थ्यांचे नियम व निकष डावलून बनविण्यात आली असल्याचे समितीचे स्पष्ट मत झालेले आहे. अशी सदोष व अन्यायकारक लाभार्थ्यांची यादी बनविणाऱ्या पंचायत समितीच्या संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करुन त्यांच्यावर तातडीने आवश्यक कारवाई करण्यात यावी तसेच उर्वरित २३ अपूर्ण विहिरींची अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करून घेवून त्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल ३ महिन्यांच्या आत समितीस सादर करण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण तीन

बीड जिल्हा परिषद

३.१ पंचायत समिती वडवणी

पंचायती राज समितीने बीड जिल्हा परिषदेच्या सन २००४-२००५ च्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक २ च्या अनुषंगाने पंचायत समिती, वडवणीकडून खालील मुद्यांबाबत लेखी माहिती मागितली. (अ) पंचायत समितीमध्ये सन २००४-२००५ मध्ये गैरव्यवहाराची किती प्रकरणे उघडकीस आली. प्रकरणनिहाय गैरव्यवहाराचे स्वरुप काय आहे व त्यात गुंतलेली रक्कम तसेच अधिकारी कर्मचारी किती आहेत व त्यापैकी किती प्रकरणे निकालात काढण्यात आली. (ब) प्रलंबित प्रकरणांपैकी किती प्रकरणांची चौकशी झाली आहे व किती प्रकरणे जिल्हा परिषदेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आली. (क) सन २००४-२००५ पूर्वी उघडकीस आलेली परंतू अ्द्याप निकालात न निघालेली प्रकरणे किती व ती प्रलंबित राहण्याचे कारणे काय आहेत. (ड) वरील "क" मध्ये विचारलेल्या प्रकरणांपैकी जुन्यात जुनी प्रकरणे केंव्हा पासूनची आहेत ?

उपरोक्त मुद्यांबाबत गट विकास अधिकारी यांनी खालीलप्रमाणे लेखी खुलासा केला_आहे.

पंचायत समिती वडवणी अंतर्गत सन २००४-२००५ मध्ये एकही गैरव्यवहाराचे प्रकरण उघडकीस आले नाही.

सन २००४-२००५ मध्ये गैरव्यवहाराची प्रकरणे नसल्याने कार्यवाही निरंक.

सन २००४-२००५ पूर्वी उघडकीस आलेली तीन प्रकरणे आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	ग्रा.प.चे नांव	वर्ष	अपहारित रक्कम	केलेली कार्यवाही
१.	ग्रा.पं.चिंचाळा	१९५९ ते १९६८	३७१८.५८	सदरची रक्कम रु.३७१८.५८ सामान्य पावती क्र.०००२ दि.५/१०/२००८ रोजी वफळ करुन ग्रा.पं.खात्यावर जमा केलेली आहे.
२.	ग्रा.पं.बाहेगव्हाण	१९९९ ते २००२	२०,०००/-	जवाहर रोजगार योजनेतील अपहारीत रक्कमेपैकी कामाचे मुल्यांकन रु.१९,९८९ रु. झालेले असून उर्वरीत रक्कम रु.११ संबंधीत ग्र.पं.खाती जमा केलेली आहे.
३.	ग्रा.पं.खडकी	८९ ते ९३-९४	४५,१४५/-	अपहारीत रकमेसंबंधात तत्कालीक ग्रामसेवक

				श्री.नायने जी.टी.अंतर जिल्हा बदलीने स्थलांतरीत झालेला आहे व अपहारातील रक्कमेचे अभिलेखे उपलब्ध न झाल्यामुळे ापहारातील रक्कमेची वसुलीबाबत कार्यवाही करता आलेली नाही.

वरीलपैकी २ प्रकरणे निकाली काढण्यात आलेली असून एका प्रकरणातील अपहारीत रकमेच्या वसुलीचा पाठपुरावा सुरु आहे.

वरील पैकी १) चिंचाळा ग्रा.नि.अपहार प्रकरण सन १९५९ ते १९६८ चे आहे, २) बाहेगव्हाण जवाहर रोजगार योजना अपहार प्रकरण १९९९-२००२ वर्षाचे आहे व ३) खडकी जवाहर रोजगार योजना अपहार प्रकरण १९८९-१९९० ते १९९३-१९९४ वर्षाचे आहे.

समितीने वरील प्राप्त माहितीच्या अनुषंगाने दिनांक १९ नोव्हेंबर, २००८ रोजी चिंचाळा ग्रामपंचायतीस भेट दिली असता, चिंचाळा ग्रामपंचायतीच्या नोंदवह्यांमध्ये इंग्रजी शब्दांचा वापर होता. दिनांक १२ फेब्रुवारी, २००८ च्या मासिक/ग्रामसभेच्या बैठकीनंतर बैठक होवूनही त्याबाबतचा उल्लेख इतिवृत्तामध्ये नव्हता. रजिस्टरमध्ये अनेकदा काही पृष्ठांनतर दोन-चार पृष्ठे कोरी सोडलेली होती. मासिक सभा एक महिन्याच्या आत घेण्याचे बंधन असतानाही ती एक महिन्यानंतर घेण्यात आली. दिनांक २२ जानेवारी, २००८ नंतर ग्रामपंचातीला विस्तार अधिकारी (पं) यांनी एकदाही भेट दिली नाही. मासिक सभेचे रजिस्टर प्रमाणित नव्हते. तत्कालीन ग्रामसेवक श्री.बी.आर.डोरले यांनी नियमानुसार इतिवृत्ताची नोंद केली नाही. इतिवृत्ताचा शेवट केला नाही. शिवाय मासिक सभेच्या इतिवृत्ताशेवटी सरपंचाच्या स्वाक्षऱ्या नव्हत्या. घरपट्टी/पाणीपट्टी व विजेची थकबाकी लाखो रुपये असताना एकूण वसुलीपैकी केवळ १५ टक्के वसुली केलेली असल्याचे दिसून आले. विस्तार अधिकाऱ्यांनी वसुलीसाठी वसुली पथक पाठविले नाही. ग्रामपंचायत कार्यालयात कॅशबुक बघावयास मिळाले नाही, त्याऐवजी झेरॉक्स प्रती दाखविण्यात आल्याचे आढळून आले. पंचायत समिती सदस्यांनी तत्कालीन ग्रामसेवक श्री.डोरले हे कित्येक दिवस ग्रामपंचायत कार्यालयात येत नाहीत तसेच पंचायत समिती सदस्यांच्या सह्या रजिस्टर्सवर घेत असल्याची माहिती समितीस भेटीच्या वेळी दिली होती. चिंचाळा ग्रामपंचायत कार्यालयाने आमसभा, ग्रामसभा व मासिकसभेचे पुस्तक योग्यप्रकारे न भरल्यामुळे तसेच त्यावर सरपंचाच्या सह्या न घेतल्यामुळे सर्व रजिस्टर्सचा तसेच वसुलीच्या रजिस्टरचा पंचनामा करून समितीने भेटीच्या वेळी ताब्यात घेतले. सभेच्या इतिवृत्तात शेततळी/शेतविहीरींच्या प्रस्तावावेळी अनुमोदन दिलेल्या सदस्यांची नावे आढळून आली नाहीत. ग्रामपंचायतीने ठराव केलेला नसताना सुद्धा बनावट ठरावाची प्रत पंचायत समितीला भेटीच्या वेळी देण्यात आली. प्रत्यक्षात त्या ठरावाची नोंद इतिवृत्तामध्ये कोठेही

आढळून आली नाही. त्यामुळे पंचायती राज समितीकडून जप्त करण्यात आलेल्या रजिस्टरर्समधील नोंदीची चौकशी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी करावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला पाठवावा व एकंदरीत तत्कालीन ग्रामसेवक श्री.बी.आर.डोरले यांच्या अकार्यक्षम व मनमानी कारभारामुळे त्यांना निलंबीत करण्यात यावे असे समितीने भेटीच्या वेळी बीड जिल्हा परिषदेस निदेश दिले.

समितीला प्रत्यक्ष भेटीत मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने ग्रामविकास विभागाकडून खालील मुद्यांबाबत माहिती मागितली.

१. पंचायत समिती, वडवणी अंतर्गत चिंचाळा ग्रामपंचायतीस समितीने भेट दिली असता, सदर ग्रामपंचायत कार्यालयातील अभिलेखे सुस्थितीत व अद्ययावत स्वरुपात न ठेवल्याचे तसेच काही अभिलेखे तर समितीस संबंधितांकडून उपलब्ध करून देण्यात आले नाहीत याबाबत समितीने संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्यात येवून, सदर ग्रामपंचायतीच्या एकंदरीत कारभाराची संपूर्ण चौकशी करून अहवाल पाठविण्याबाबत निदेश दिले होते त्यानुसार संबंधितांवर तसेच ग्रामसेवकावर नियंत्रण ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली,

२. तसेच चौकशीबाबतचा अहवाल अद्यापपर्यंत न दिल्याची कारणे काय आहेत ?

ग्रामविकास विभागाने वरील मुद्यांबाबत समितीला पुढीलप्रमाणे लेखी माहिती पुरविली.

१. मुद्याचे अनुषंगाने सादर करण्यात येते की, ग्रामपंचायत चिंचाळा, ता.वडवणी येथील अभिलेखे सुस्थितीत व अद्यावत स्वरुपात न ठेवल्यामुळे व काही अभिलेखे समितीस संबंधिताकडून उपलब्ध करून न दिल्यामुळे संबंधित ग्रामसेवक श्री.बी.आर.डोरले यांना आदेश क्र.साप्रवि ७ प./नियो/पंरास/कावि/३१९४/२००९ दिनांक २७/५/२००९ अन्वये निलंबीत करण्यात आले आहे.

२. महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम, १९६४ मधील ६(२) नुसार कारणे दाखवा नोटीस जोडपत्र १ ते ४ बजावण्यात आले असुन या कार्यालयाचे आदेश क्र.साप्रवि ७ पं नियो/५५२३/२०१० दिनांक २/११/२०१० अन्वये विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.

मुद्दा क्र. २ च्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, पंचायती राज समितीने, पंचायत समिती वडवणीला दि.१९/११/२००८ रोजी दिलेल्या ग्रामपंचायत चिंचाळा येथील भेटीत दर्शविलेल्या त्रुटीबाबतचा अहवाल खालीलप्रमाणे दि.३०/१०/२०१० रोजी ग्रामपंचायत, चिंचाळा येथील पंचायती राज समितीने दर्शविलेल्या त्रुटीचा अहवाल सुचविले वरुन खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१. ग्रामसेवकांचे रजिस्टरमध्ये पूर्णपणे मराठीचा वापर केलेला आहे. फक्त सन २००८ ऐवजी इंग्रजी सन २००८ असे नमुद केलेले आहे.

२. दिनांक १२/०२/२००८ मासिक सभेच्या इतिवृत्ताची नोंद मासिक सभेच्या कार्यवृत्त पुस्तीकेत नमुद असून ती सभा कायम असल्याचे समजते. त्रुटींबाबत ग्रामसेवकास विचारणा केली असता नजर चुकीने तीन चार पाने कोरी सुटल्याचे त्याने कबुल केले आहे. तसा लेखी अहवाल भेटीच्या वेळी दिलेला आहे.

३. मासिक सभा नियमाप्रमाणे घेण्यात आलेल्या आहेत असे दिसून येते.

४. मासिक सभेचे रजिस्टर रोजी प्रमाणित केल्याचे आढळून आले.

५. तत्कालीन ग्रामसेवक श्री. बी.आर.डोरले यांना, भेटीच्या वेळी दिलेल्या सुचनेनुसार अकार्यक्षम कारभारामुळे दिनांक २७/०५/२००९ रोजी निलंबित केलेले आहे.

६. घरपट्टी, पाणीपट्टी, थकीत वसुलीबाबत बिले बजावल्याचे श्री.डोरले यांनी सांगितले.

७. माहे डिसेंबर २००८ पासून विद्यमान ग्रामसेवक श्री.मोरे यांनी मासिक सभा/ग्रामसभेचे अभिलेखे अद्ययावत ठेवले असून सरपंचाच्या स्वाक्षरी आहेत.

८. पंचायती राज समिती यांनी भेटीच्या वेळी कॅशबुक ऐवजी झेरॉक्स प्रत होत्या असे नमुद करून त्रुटी दर्शविल्यामुळे, पहाणी केली असता रोजी कॅश बुक उपलब्ध आहे. श्री.डोरले यांना विचारणा केली असता दि.१०/११/२००८ रोजी श्री.बी.आर.नागरगोजे यांना पदभार देण्यात आला होता. त्यांनी कॅशबुक न दाखवता बँक बचत खाता वहीची प्रत दाखविलेली आहे असे तात्कालीन ग्रामसेवकाचे म्हणणे आहे.

९. श्री.बी.आर.डोरले यांना दि.१०/१०/२००८ रोजी सदर ग्रामपंचायतीचा कार्यभार देण्याचे आदेश मिळाले त्यानुसार श्री.बी.आर.नागरगोजे यांना दि.१०/११/२००८ रोजी कार्यभार देण्यात आला. त्यामध्ये विविध योजनेचे कॅशबुक दिलेले नाही.

१०. श्री.बी.आर.नागरगोजे यांच्याकडून श्री` एन.बी..मोरे यांना कार्यभार देण्याचे दि.१९/१२/२००८ ला आदेश देण्यात आले. त्यानुसार दि.२९/०५/२००९ रोजी श्री. एन.बी.मोरे यांना कार्यभार देण्यात आला.

११. घरपट्टी, पाणीपट्टी वसुलीबाबत बीले बजावल्याचे ग्रामसेवकाने सांगितले परंतु प्रत्यक्षात दाखविले नाहीत. त्यानंतर माहे मार्च २०१० अखेर श्री. एन.बी. मोरे यांनी ३० ते ३५ टक्के वसुली केली आहे.

सचिवांची साक्ष :

चिंचाळा ग्रामपंचायत कार्यालयातील अभिलेखे सुस्थितीत व अद्ययावत स्वरुपात ठेवलेले नव्हते ग्रामपंचायतीच्या संबंधित कर्मचाऱ्यांनी समितीस अभिलेखे उपलब्ध करून दिले नाहीत याबाबत ग्रामपंचायतीची संपूर्ण चौकशी करून संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्याच्या सूचना समितीने साक्षीच्या वेळी दिल्या होत्या. त्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी संबंधित ग्रामसेवकाकडून अंतिम कारणे दाखवा नोटीस साप्रवि ७ पंनि/कावी १६७१,दिनांक ९/४/२००९ अन्वये खुलासा मागविला आहे. सदर खुलासा असमाधानकारक असल्यामुळे या कार्यालयाचे आदेश क्रमांक साप्रवि ७ पं/नियोअ/कावी ३१९४, दिनांक २७/५/२००९ अन्वये रोजी ग्रामसेवकास निलंबित करण्यात आले आहे. तसेच त्याची विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेली आहे असे समितीस साक्षीच्या वेळी सांगितले तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस संबंधित ग्रामसेवकास निलंबीत करण्यात आले होते. तथापि, आता त्यांची पुननिर्युक्ती करण्यात आलेली असून विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेली आहे अशी माहिती दिली. समितीने चौकशीमध्ये कोणते विषय समाविष्ट करण्यात आले आहेत असे विचारले असता चौकशीमध्ये अभिलेखे व्यवस्थित न ठेवल्याचे आढळल्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी, समितीस माहिती दिली. समितीने पुढे ग्रामसेवक निलंबित आहेत असे विभागिय सचिव सांगत आहेत व त्यांची पुननिर्युक्ती केली आहे असे मुख्य कार्यकारी अधिकारी सांगत आहेत व या दोघांच्या कथनामध्ये एकवाक्यता नाही त्यामुळे दोन्ही अधिकाऱ्यांनी एकमेकांशी विचार विनियम करुन उत्तर द्यावे असे बजावून आता चौकशी पुर्ण झाली आहे काय, असे समितीने विचारले असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी, संबंधितांवर दोषारोप ठेवण्यात आले आहेत. कामामध्ये निश्चितपणे निष्काळजीपणा करण्यात आलेला आहे. समितीच्या सुचनेनुसार संबंधित ग्रामसेवक व ग्रामपंचायत

यांच्या संपूर्ण करावयाच्या चौकशीपैकी ग्रामपंचायतीची चौकशी केली असता त्यात सदर ग्रामसेवक दोषी असल्याचे आढळून आले आहे. व यासंदर्भात सविस्तर चौकशी अहवाल समिती कार्यालयास सादर करण्यात आलेला आहे. व यांचा समावेश चौकशीमध्ये करण्यात आलेला आहे असे समितीस उत्तर दिले. तत्कालीन समिती प्रमुखांच्या निदर्शनास त्यावेळी ज्या त्रुटी आल्या त्यानुसार चौकशी करण्याचे आदेश दिले होते. गट विकास अधिकारी यांनी सदर रक्कम का खर्च केली नाही, असे समितीने विचारले असता याचे गट विकास अधिकारी हे समितीस साक्षीच्या वेळी उत्तर देवू शकले नाहीत, त्यामुळे त्यांची चौकशी करुन त्यांना निलंबित करण्याचे आदेश देण्यात आले होते. त्याप्रमाणे कार्यवाही झालेली आहे काय, असे समितीने पुढे विचारले असता, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी गट विकास अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे, असे उत्तरादाखल समितीस सांगितले. समितीने चर्चेधीन विषय सन २००४-२००५ मधील असुन त्यास दिनांक २/११/२०१० रोजी नोटीस दिली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्याचवेळी कारवाई करावयास पाहिजे होती. तथापि, आता समितीची साक्ष लागल्यामुळे नोटीस काढून चौकशी प्रस्तावित केली आहे, असा समितीचा समज झाला आहे. यासंदर्भात समितीने असे आदेश दिले होते की, तत्कालीन तसेच सध्याचे कार्यरत गट विकास अधिकारी श्री.भारती यांना कारणे दाखवा नोटीस देवून त्यांच्यावर कडक करवाई करण्यात यावी. या संदर्भात विभागीय सचिवांची साक्ष घेवून त्यांच्याकडून माहिती घेण्यात यावी. श्री.भारती हे या पदावर काम करण्यास लायक नाहीत अशी समितीची धारणा झालेली असल्याने त्यांना उप मुख्य कार्यकारी अधिकारी पदाचा दिलेला कार्यभार आजच्या आज काढून घेण्यात यावा व यासंदर्भात कार्यवाहीचे आदेश समितीस साक्षीच्या दिवशी संध्याकाळपर्यंत दाखविण्यात यावेत असे समितीने आदेश दिले.

साक्षीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी, श्री.आर.आर.भारती, गट विकास अधिकारी यांच्याकडे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं) यांचेकडे पदाचा अतिरिक्त कार्यभार दिनांक २९/९/२००७ ते २१/७/२००८ पर्यंत सोपविला होता. जिल्हा परिषदेतील अनेक प्रकरणात दोषी असलेल्या प्रकरणात त्यांना या कार्यालयाचे पत्र क्र.साप्रवि/१अ/कावि/७०१/दिनांक १९/११/२००८ अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावून खुलासा मागविण्यात आला त्यानूसार श्री.भारती यांनी खुलासा सादर केला असून सदर खुलासा समाधानकारक नाही. व या कालावधीत यशवंत ग्राम समृद्धी योजनेअंतर्गत कामास निधी वितरीत करते वेळी कागद पत्राची छाननी करता व जेष्ठता यादीतील प्राधान्यक्रम विचारात न घेता ग्रामपंचायतींना अनुदान वितरित केल्याप्रकरणी पर्यवेक्षणात निष्काळजीपणा करून गंभीर स्वरुपाची

अनियमितता झाल्याने श्री.भारती यांना जबाबदार धरुन त्यांचेविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही घेण्यासाठी या कार्यालयाच्या दिनांक ९/२/२००९ रोजीच्या पत्रान्वये श्री.भारती यांना निलंबीत करण्याच्या शिफारशीसह जोडपत्र १ ते ४ मध्ये दोषारोप बजाविण्यासाठी विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद मार्फत त्यांच्या पत्र दिनांक २१/३/२००९ रोजीच्या पत्रान्वये शासनाकडे सादर करण्यात आलेले आहे. तथापी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे रोजीचे पत्र दिनांक २०/७/२००९ (जे की या कार्यालयास दिनांक २७/७/२००९) रोजी प्राप्त झाले. अन्वये प्रस्तुत प्रकरणी यशवंत ग्राम समृद्धी योजनेअंतर्गत निधी वितरीत केलेल्या कामाच्या प्रगतीबाबत कार्यकारी अभियंता यांचे प्रमाणपत्र इ. सह सुधारीत दोषारोपपत्र तयार करुन १ महिन्याचे आत सादर करण्याविषयी निर्देश दिलेले आहेत. त्याप्रमाणे पुर्तता करुन अनुपालन सादर करण्यात येईल व तसेच श्री.भारती यांचेकडून पंचायत समिती बीड अंतर्गत प्रा.शिक्षकांचे बदल्यामध्ये गंभीर स्वरुपाची अनियमितता झाली असल्याचे निदर्शनास आले आहे. त्या अनुषंगाने जोडपत्र १ ते ४ तयार करुन विभागीय आयुक्त, औरंगाबाद मार्फत शासनास सादर करण्यात येत आहे. अशी लेखी माहिती साक्षीच्या वेळी समितीस देण्यात आली. तसेच सदर गट विकास अधिकारी एकाच वेळी दोन्ही ठिकाणी काम करु शकणार नाहीत. तत्कालीन गट विकास अधिकाऱ्यांनी मात्र सन २००४-२००५ मध्ये पैसे का खर्च केले नाहीत या संदर्भात त्यांना शोकॉज नोटीस इश्यू करण्यात यावी असे समितीने साक्षीच्यावेळी सांगण्यात आले.

समितीच्या आदेशानुसार त्याच दिवशी संध्याकाळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांच्याकडील कार्यभार काढण्यात आलेला आहे अशी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस माहिती दिली तसेच गट विकास अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी शासन स्तरावर सुरु करण्यात आली आहे अशी विभागीय सचिवांनी समितीसमोर माहिती दिली. या प्रकरणास पाच वर्ष पूर्ण झाली आहेत. सन २००४-२००५ मधील हे प्रकरण आहे सन २०१० मध्ये विभागीय चौकशी सुरु करण्यात येत आहे, ही बाब योग्य नाही असे साक्ष घेताना समितीने मत व्यक्त केल्यानंतर असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून माहे नोव्हेंबर, २००८ मध्ये पंचायती राज समितीने बीड जिल्हा परिषदेस भेट दिली होती. सदर समितीचे कार्यवृत्त सन २००९ मध्ये प्राप्त झाले आहे त्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात आलेली आहे असे साक्षीच्या वेळी समितीस सांगण्यात आले.

समितीने विभागीय चौकशी अहवाल किती दिवसात प्राप्त होणार आहे अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी विभागीय चौकशी शासन स्तरावर सुरु आहे. कमीत कमी सहा महिन्यांचा कालावधी यासाठी लागेल असे समितीस सांगितले.

विभागीय चौकशीची मुदत आणखी वाढवून देण्यात येवून नये असे समितीने साक्षीच्यावेळी बजावले त्यानुसार विभागीय सचिवांनी, चौकशी सहा महिन्यांच्या आत पूर्ण करण्यात येईल असे समितीस सांगितले. समितीने सहा महिन्याच्या आत विभागीय चौकशी पूर्ण झाली नाही तर जो अधिकारी विभागीय चौकशी करीत आहे, त्याच्यावर कारवाई करण्यात यावी असे समितीने सांगितले असता समितीच्या सूचनांप्रमाणे कार्यवाही होईल असे विभागीय सचिवांनी साक्षीच्यावेळी समितीस आश्वासीत केले.

अभिप्राय व शिफारशी :

पंचायती राज समितीने दिनांक १९ नोव्हेंबर, २००९ रोजी वडवणी पंचायत समिती अंतर्गत चिंचाळा ग्रामपंचायतीस दिलेल्या भेटीच्या वेळी ग्रामपंचायत कार्यकारणी व अभिलेखे सुस्थितीत व अद्यावत नव्हते. समितीच्या भेटीच्या वेळी ते समितीस उपलब्ध न झाल्याप्रकरणी ग्रामसेवक श्री.बी.आर.डोरले यांना दिनांक २७.५.२००९ रोजी निलंबीत करण्यात आले. तथापि, त्यांना पुनःसेवत घेवून त्यांची विभागीय चौकशी पूर्ण करून त्याचा अहवाल समिती कार्यालयास सादर करण्यात आल्याची माहिती समितीस साक्षीच्या वेळी देण्यात आली.

तसेच श्री.भारती गट विकास अधिकारी यांनी तसेच त्यांच्यावर उपमुख्य कायर्कारी अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार असतांना यशवंत ग्राम समृध्दी योजनेअंतर्गत निधी वाटप करतांना जेष्ठता यादी विचारात घेतली नसल्याने, तसेच बीड पंचायत समितीअंतर्गत प्राथमिक शिक्षकांच्या बदल्यांमध्ये गंभीर अनियमितता झाल्याप्रकरणी केलेल्या चौकशी अहवालात आढळलेल्या त्रुटीवरुन गट विकास अधिकारी समाधानकारक खुलासा करु शकले नाहीत त्यामुळे त्यांच्यावर कारणे दाखवा नोटीस काढण्यात आली होती. **सदर विषय हा सन २००४-२००५ च्या प्रशासन अहवालाबाबत असल्याने समितीची साक्ष लागल्यामुळे चौकशी प्रस्तावीत करण्यात आल्याचे समितीचे मत झाले आहे.** यासंदर्भात **गट विकास अधिकारी श्री.भारती यांच्याकडील उपमुख्य कार्यकारी अधिकारी पदाचा अतिरिक्त भार तातडीने काढून घेण्यात आलेला आहे व निधी अखचिर्त ठेवणाऱ्या गट विकास अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी ५ वर्षांनी करण्यात येत आहे ही बाब योग्य नाही असे मत समितीने**

व्यक्त केले आहे. तसेच विस्तार अधिकारी, पंचायत समिती यांनी चिंचाळा ग्रामपंचायतीस माहे जानेवारी, २००८ नंतर एकदाही भेट दिलेली नाही ही बाबही तितकीच गंभीर आहे. सदर चौकशी सहा महिन्यांच्या आत पूर्ण करावी अन्यथा चौकशीस अधिक विलंब लावणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करावी ही समितीने केलेली सूचना विभागीय सचिवांनी साक्षीच्या वेळी मान्य केली आहे.

गट विकास अधिकाऱ्याने योजनेवर खर्च करावयाची रक्कम खर्च न केल्याने याप्रकरणी कार्यालयीन प्रमुख या नात्याने मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्या अधिकाऱ्यावर चौकशी करून आवश्यक ती कारवाई करणे आवश्यक होते. तथापि, पंचायती राज समिती बीड जिल्ह्यास भेट देईपर्यंत आवश्यक कार्यवाही झालेली नव्हती. श्री.बी.आर.डोरले, ग्रामसेवक यांच्यावर सोपविलेला कार्यभार त्यांनी जबाबदारीने पार पाडलेला नव्हता.

वरील **सर्व बाबींचा विचार करता प्रस्तावित विभागीय चौकशी सहा महिन्याच्या आत पूर्ण करून त्याबाबतचा अहवाल समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

३.२ उस तोड कामगारांच्या मुलांसाठी असलेल्या वस्तीशाळा :

सन २००४-२००५ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्र.१ नूसार अहवाल वर्षात शासनाकडून योजना निहाय किती अनुदान अपेक्षित होते व प्रत्यक्षात किती अनुदान प्राप्त झाले, योजना निहाय अपेक्षेपेक्षा कमी अनुदान प्राप्त झाले असल्यास त्याची सर्वसाधारण करणे काय आहेत, तसेच अनुदान कमी मिळाल्यामुळे योजनेच्या अंमलबजावणीवर त्याचा काय परिणाम झाला ? (हस्तांतरीत योजना) अशी लेखी महिती विचारली होती त्यास केलेल्या खुलाशात बीड जिल्हा परिषदेने शालेय पोषण आहार योजनेसाठी रु.८,००,००,०००/- कोटी एवढी मागणी केली होती. तथापि, प्रत्यक्षात रु.७,५२,४५,०००/- एवढा निधी देण्यात आला, म्हणजेच रु.४७,५५,०००/- एवढा निधी कमी देण्यात आला (तो अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात निधीची मागणी केली होती. तथापि निधी कमी प्राप्त झाला) असे म्हटले आहे.

उपरोक्त मुद्यासंदर्भात पंचायती राज समितीने दिनांक २० नोव्हेंबर, २००८ रोजी बीड जिल्हा परिषदेस दिलेल्या भेटीच्या वेळी समितीस शालेय पोषण आहाराच्या बाबतीत रु.७,५२,४५,०००/- ची

मागणी होती. परंतु, प्रत्यक्षात रु.२,१३,९२,८२५/- एवढाच निधी प्राप्त झाला व जवळपास रु.५,३८,५२,१७५/- एवढा निधी कमी प्राप्त झाला. अशी माहिती प्राप्त झाली, याबाबत जिल्हा परिषदेने, शासनाने खाजगी संस्थांना शालेय पोषण आहार देण्याबाबत आदेश निर्गमित केले परंतु, खाजगी संस्थेकडून परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त न झाल्यामुळे खर्च कमी झाल्याबाबतची जबाबदारी कोणाची आहे अशी विचारणा केली असता, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी समितीस खाजगी संस्थांनी प्रस्ताव दिले पाहिजेत असा खुलासा केला. समितीने खाजगी संस्थांनी प्रस्ताव दिले नसतील तर त्यांच्यावर कारवाई करण्याची जबाबदारी कोणाची आहे अशी पृच्छा केली असता त्यांनी ती जिल्हा परिषदेची असून संस्थांकडून प्रस्ताव मागून घेतो असे शिक्षणाधिकारी (प्रा) यांनी समितीस माहिती दिली. समितीने, प्रशासनाच्या अशा कारभारामुळे विद्यार्थी शालेय पोषण आहारापासून वंचित राहिले आहेत. जिल्हा परिषदेमध्ये अनेक पदाधिकारी कार्यरत आहेत, त्यांना त्याची कल्पना दिली असती तर त्यांनी संस्थांकडून प्रस्ताव पूर्ण करुन घेतले असते, असे स्पष्ट करुन पूर्वीच्या शिक्षणाधिकाऱ्यांवर कारवाई करावी असे निदेश देवून ते बैठकीच्या वेळी उपस्थित नसल्याने त्यांना बोलावून आणले. समितीने पुढे राज्यातील सर्वाधिक उस तोडणी कामगार बीड जिल्ह्यात आहेत व समितीच्या महितीनूसार जवळ जवळ सहा लाखापेक्षा अधिक उस तोडणी कामगार बीड जिल्ह्यात आहेत त्यांच्या मुलांसाठी वस्तीशाळा सुरु करण्यासाठी निधी मिळविण्याबाबत काय प्रयत्न केले, अशी समितीने विचारणा केली असता, चालू वर्षी रु. तेरा कोटी मंजूर असून उस तोडणी कामगारांच्या ६४ हजार विद्यार्थ्यांची पडताळणी करुन संभाव्य विद्यार्थी संख्येची माहिती दिवाळीपूर्वी सादर करीत असतो असे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी समितीस माहिती दिली. समितीने उस तोडणी कामगार दिवाळीपूर्वीच बाहेर गेले असून प्रत्यक्षात त्यांच्या मुलांच्या महितीची आकडेवारी यापूर्वीच गोळा करुन काम सुरु होणे आवश्यक होते व येथे उस तोडणी कामगारांच्या मुलांसाठी निवासी शाळांच्या प्रश्नावर चर्चा सुरु असल्याने त्यांच्या निवासाची काय व्यवस्था केली आहे, त्यांना जो निधी प्राप्त झाला तो प्रत्यक्षपणे या मुलांच्या निवाससोयीवर खर्च करण्यात येणार आहे काय, प्रत्यक्षात उस तोडणी कामगार गावाबाहेर गेल्यानंतर त्यांच्या मुलांसाठी निवासी शाळांची गरज असते, त्यासाठी जे अनुदान प्राप्त होते त्यातून किती निवासी शाळा सुरु करण्यात आल्या आहेत व या योजनेखाली गतवर्षी जे अनुदान प्राप्त झाले त्यातून किती निवासी शाळा सुरु करण्यात आल्या अशी समितीने विचारणा केली असता शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी गेल्यावर्षी रु. चार कोटी एवढे अनुदान प्राप्त झाले होते, त्यातून फक्त २८ हजार विद्यार्थ्यांना

आहार घेता आला, यावर्षी ६४ हजार विद्यार्थी आहेत याबाबतची परिपूर्ण माहिती संकलित केल्यानंतर नेमक्या आकडेवारीची माहिती उपलब्ध होईल असे त्यांनी समितीस सांगितले. सदर माहितीसाठी जिल्हा परिषदेने ग्रामशिक्षण समित्यांना पत्र व्यवहार केलेला असून निवासी शाळांबाबत निर्णय होईपर्यंत शालेय पोषण आहार कार्यक्रम सुरु ठेवावा अशी समितीस विनंती केली. समितीने पुढे शासनाने तरतूद करुन देखील जिल्हा परिषद स्तरावर काहीच प्रयत्न होत नसल्याबाबत खंत व्यक्त केली. समितीने विषयाचे गांभिर्य विषद करुन जिल्ह्यातील पाच सहा लाख उस तोडणी कामगार कामानिमित्त बाहेर जात असल्याने, त्यांच्या मुलांच्या शिक्षणाबाबत सोय होण्याबाबतची आवश्यक कार्यवाही शालेय शिक्षण विभागाने केलेली नाही अशी खंत व्यक्त करून शालेय शिक्षण विभागाकडील निधी योग्य प्रकारे खर्च होत नाही त्यामुळे त्याचा अपहार होतो. असा निष्कर्ष काढला. राज्यात अनेक ठिकाणी बोगस शाळा आहेत त्यावर आवश्यक व सविस्तर चर्चा होण्यासाठी मागील चार पाच वर्षातील आकडेवारीबाबत साक्ष घेण्यात यावी असे जिल्हा परिषदेस निदेश देण्यात आले. सदर विषय शालेय शिक्षण विभागापूरता मर्यादित नसून साक्षीच्या वेळी ग्रामविकास विभागाचे प्रतिनिधी तसेच विभागीय आयुक्त यांनाही साक्षीसाठी बोलाविण्यात यावे असे सांगून समितीने शालेय शिक्षण विभागासाठी आलेला निधी शाळा सुरु करण्यासाठी असतो की, निवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी असतो अशी विचारणा केली असता शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी तो निवासी शाळा सुरु करण्यासाठी असल्याबाबतचा खुलासा करुन, सन २००८ मध्ये विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नयेत यास्तव मुख्याध्यापक व ग्रामशिक्षण समितीच्या अध्यक्षामार्फत भोजन व निवास व्यवस्था करण्यात येणार आहे, असा समितीस खुलासा केला. समितीने सदर निधी ग्रामशिक्षण समितीकडे गेल्याने विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहतील अशी शंका व्यक्त केली असता, तत्कालीन शिक्षणाधिकाऱ्यांनी ते जानेवारी, २००५ मध्ये जिल्हा परिषद बीड येथे होते. तथापि, आता ते जिल्हा रायगड येथे कार्यरत असल्याचा खुलासा केला त्यावेळी समितीने सदर बाब त्यांच्याच कार्यकाळातील असल्याने शिक्षणाधिकारी या नात्याने त्यांनी शालेय पोषण आहार व अन्य योजनांबाबत काय कार्यवाही केली, अशी समितीने विचारणा केली असता त्यांनी समितीस अहवाल वर्षी शालेय पोषण आहार योजनेसाठी रु.७,५२,४५,०००/- तरतूद करावयाची होती तथापि त्यापैकी ५ कोटी रुपये दि.३१ मार्च रोजी कार्यालयीन वेळेनंतर प्राप्त झाल्याने ते त्यांनी कोषागारातून काढून जिल्हा निधीत जमा केले. सदर निधी पुढील वर्षी खर्च करण्याबाबत अनुमती मिळाल्याने तो शासनादेशानूसार

शालेय पोषण आहार व मुख्याध्यापक आणि शिक्षकांचे मानधन यावर खर्च करण्यात आल्याबाबत समितीस भेटीच्या वेळी सांगण्यात आले.

समितीने भेटीच्या वेळी प्राप्त माहितीच्या अनुषंगाने दि.१० नोव्हेंबर, २०१० रोजी जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांची साक्ष घेतली. त्यावेळी पुढील मुद्याबाबत माहिती मागितली.

१. उस तोड कामगारांच्या मुलांसाठी जिल्ह्यात एकूण किती वस्ती शाळा आहेत व अशा वस्ती शाळांतील विद्यार्थी संख्या किती आहे,

२. उस तोड कामगारांच्या मुलांसाठी असलेल्या वस्ती शाळांना शासनामार्फत वेगळा निधी देण्यात येतो किंवा कसे याबाबत खुलासा करण्यात यावा, तसेच असा निधी देण्यात येत असल्यास, तो देण्याबाबतची कार्यपद्धती तसेच त्यात खर्चाच्या कोणत्या बाबीचा समावेश करण्यात येतो याचा देखील तपशील देण्यात यावा व त्याप्रमाणे जिल्हा परिषद, बीडला वर्ष निहाय आतापर्यंत किती निधी देण्यात आला याची माहिती देण्यात यावी,

३. सदर वस्ती शाळांतील विद्यार्थांना शासनामार्फत कोणकोणत्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात त्याप्रमाणे बीड जिल्ह्यातील अशा विद्यार्थांना सुविधा पुरविण्यात आल्या आहेत काय, नसल्यास त्याची कारणे काय आहेत,

४. अहवाल वर्षात जिल्हा परिषदेला प्राप्त झालेल्या अनुदानातुन वस्ती शाळांतील विद्यार्थ्यांना पुर्णवेळ आहार देता आला नाही, याची कारणे काय आहेत व यास कोण जबाबदार आहे ?

उपरोक्त मुद्यांबाबत शालेय शिक्षण विभाग तसेच ग्रामविकास विभाग यांनी खालील प्रमाणे समितीस लेखी खुलासा केला.

१. उस तोड कामगारांच्या मुलांसाठी बीड जिल्ह्यात स्वतंत्ररित्या वस्तीशाळा चालविल्या जात नाहीत. परंतु, बीड जिल्ह्यातील उस तोड कामगारांच्या मुलांना स्थलांतरापासून रोखून ठेवण्यात येते. या जिल्ह्याने उस तोड कामगारांच्या मुलांना स्थलांतरापासून रोखुन ठेवलेली वर्षनिहाय संख्या पुढीलप्रमाणे आहे.
सन २००४-२००५=१७५७, २००५-२००६=१३६११, २००६-२००७=२५४२३, २००७२००८=३३५४५, २००८-२००९=५२०४७, २००९-२०१०=५१९६६

२. बीड जिल्हा हा उस तोड कामगारांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. या जिल्ह्यातून खूप मोठ्या प्रमाणावर उस तोड मजूर इतरत्र हंगामी स्थलांतरीत होतात. त्यांच्यासोबत त्यांची मुलेही हंगामी स्थलांतरीत होतात त्यामुळे त्यांच्या शिक्षणामध्ये खंड पडतो म्हणून सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत अशा मुलांना हंगामी स्थलांतरापासून रोखून ठेवण्याचा एक महत्वाकांक्षी प्रयत्न बीड जिल्ह्यामध्ये करण्यात येत आहे. यामध्ये AWP & B सन २००७-२००८ मध्ये ३९८.७५ लक्ष, सन २००८-२००९ मध्ये १२१५.१७ लक्ष, सन २००९-२०१० मध्ये ९७४.०० लक्ष, व सन २०१०-२०११ मध्ये ९७४.०० लक्ष असा वर्षनिहाय निधी या जिल्ह्यास मंजूर झाला आहे. सदर निधी प्राप्त झाल्यानंतर माहे ऑगस्ट किंवा सप्टेंबर मध्ये अशा कुटूंबांचे सर्वेक्षण करण्यात येते. सर्वेक्षणामध्ये आलेल्या विद्यार्थ्यांना त्याच गावामध्ये रोखून ठेवण्याकरिता विविध प्रकारचे नियोजन करुन त्या ठिकाणच्या ग्रामशिक्षण समितीमार्फत अशा मुलांना त्यांच्याच गावामध्ये स्थलांतरापासून रोखून ठेवून त्यांच्याच नियमित शाळेत या मुलांना शिक्षण देण्यात येते. वार्षिक कार्यनियोजन व अंदाजपत्रकाच्या अधीन राहून सर्व शिक्षा अभियान जिल्हा कार्यकारी समितीच्या ठरावानुसार सदर मुलांना ग्राम शिक्षण समितीमार्फत पालकत्व देवून भोजन व्यवस्था करण्यात येते.

३. उस तोड कामगारांच्या मुलांसाठी वेगळ्या शाळा नसल्यामुळे ही सर्व मुले आपापल्या नियमित शाळेत शिक्षण घेतात, त्यामुळे सदर विद्यार्थ्यांना शासनामार्फत दिलेल्या सर्व सुविधा त्यांच्या नियमित शाळेमध्ये मिळतात, सबब त्यांच्याकरिता वेगळ्या सुविधा पुरविण्याची आवश्यकता वाटत नाही.

४. सन २००४-२००५ मध्ये उस तोड कामगारांच्या मुलांसाठी वेगळ्या वस्तीशाळा नव्हत्या, त्यामुळे पुर्णवेळ आहार ही योजना सदर विद्यार्थ्यांना लागू करता आली नाही. सदरील वर्षात उस तोड कामगारांच्या मुलांना हंगामी स्थलांतरापासून गावस्तरावर रोखून ठेवून त्यांची प्रायोगिक तत्वावर भोजन व्यवस्था ग्राम शिक्षण समितीमार्फत पालकत्व देवून केली जात होती. गट शिक्षण अधिकारी स्तरावरून उपलब्ध झालेल्या १७५४ संख्येनुसार १४.८२ लक्ष तरतुद खर्च करण्यात आली.

पर्यायी शिक्षण योजनेंअंतर्गत सदर उपक्रमासाठी अहवाल वर्षात वेगळी तरतुद उपलब्ध नव्हती. परंतु बीड जिल्ह्यामध्ये अत्यावश्यक बाब म्हणून पर्यायी शिक्षणाच्या उपलेखा शिर्षातंर्गत उपचारात्मक वर्गामधून (Remedi˙al Teaching) सदर खर्च अहवाल वर्षात करण्यात आलेला आहे. गट शिक्षण अधिकारी यांचेकडून उस तोड कामगारांच्या मुलांची संख्या प्राप्त झाली असून त्यानुसार सदर निधी वितरीत करण्यात आला आहे. गतवर्षीप्रमाणेच याही वर्षी अशा मुलांचे संभाव्य सर्वेक्षण माहे सप्टेंबर, २०१० मध्ये करण्यात आले त्यामध्ये ४६९६५ कुटंूब संख्या व ६००६४ एवढी विद्यार्थी संख्या समितीस प्राप्त झाली आहे. सदर विद्यार्थ्यांना स्थलांतरापासून रोखून ठेवण्याकरिता शाळा स्तरावर विविध उपक्रम राबवून अशा मुलांना हंगामी स्थलांतरापासून रोखून ठेवण्याबाबत जिल्हा परिषद स्तरावर प्रयत्न करण्यात येत आहेत. सदर ठिकाणचे पालक स्थलांतरीत झाल्यानंतर व प्रत्यक्ष दिवाळीच्या सुट्या संपल्यानंतर दिनांक २२.११.२०१० रोजी पासून सदर मुलांची भोजन व्यवस्था ग्राम शिक्षण समितीमार्फत करण्यात येत आहे. सदर उपक्रम दिनांक २२.११.२०१० ते ३०.०३.२०११ या कालावधीमध्ये यशस्वीपणे राबवून जास्तीत जास्त मुलांना हंगामी स्थलांतरापासून रोखून ठेवण्यात येणार आहे.

हंगामी स्थलांतरापासून रोखलेल्या विद्यार्थ्यांची वर्षानिहाय माहिती व खर्च

अ.क्र.	वर्ष	सर्वेक्षणातील विद्यार्थी संख्या	प्रत्यक्ष रोखलेली विद्यार्थी संख्या	कालावधी	मंजूर तरतूद (रु.लाख)	खर्च (रु.लाख)	विवरण
१.	२००४-०५	१७५४	१७५४	माहे जानेवारी २००५ ते एप्रिल २००५	--	१४.८२	सदर उपक्रमासाठी AWP & B मध्ये तरतूद मान्य नव्हती व आवश्यकतेनुसार पर्यायी शिक्षणातंर्गत उपलेखाशिर्षामधील निधी उपलब्ध करून खर्च करण्यात आला आहे.
२.	२००५-०६	१३६११	१३६११	माहे नोव्हेंबर २००५ ते मार्च २००६	--	२७०.९	
३.	२००६-०७	३००८१	२५४२३	माहे डिसेंबर २००६ ते मार्च २००७	--	३०४.११	
४.	२००७-०८	५८२२५	३३५४५	माहे डिसेंबर	३९८.७५	३९८.७५	सदर विद्यार्थी आपल्या गावात राहून त्याच

				२००७ ते मार्च २००८			ठिकाणच्या शाळेमध्ये नियमित शिक्षण घेत आहेत. त्यामुळे सदर विद्यार्थ्यांना शासनामार्फत दिलेल्या सर्व सुविधा मिळतात. त्यामुळे सदर मुलांना वेगळ्या सुविधा दिल्या जात नाहीत. या विद्यार्थ्यांना सर्व शिक्षा अभियान जिल्हा कार्यकारी समितीच्या ठरावानुसार ग्रामशिक्षण समितीमार्फत पालकत्व देवून भोजन व्यवस्था करण्यात येते. सदर निधी हा ग्रामशिक्षण समितीमार्फत वितरीत केला जातो.
५.	२००८-०९	६४४३०	५२०४७	१७ नोव्हेंबर २००८ ते ३० एप्रिल २००९	१२१५.१७	११५३.७७	
६.	२००९-१०	६१६८१	५१९६६	माहे नोव्हेंबर २००९ ते मार्च २०१०	९७४.००	९७२.२९	
७.	२०१०-११	६००६४	अप्राप्त संख्या	२२ नोव्हेंबर २०१० ते मार्च २०११	९७४.००	निरंक	

सचिवांची साक्ष :

उपरोक्त महितीच्या आधारे समितीने दिनांक १० नोव्हेंबर, २०१० रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली, साक्षीच्या वेळी समितीने उस तोड कामगारांच्या मुलांसाठी असणाऱ्या वस्तीशाळांना शासनामार्फत वेगळा निधी देण्यात येतो काय, अशी विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी उस तोड कामगारांच्या मुलांसाठी स्वतंत्ररित्या वस्तीशाळा चालविल्या जातात व त्यांच्यासाठी हंगामी निवासी शाळांची तसेच भोजनाची व्यवस्था करावी लागते आणि ज्या नियमित शाळा आहेत तेथेच ही व्यवस्था करावी लागत आहे. इतर शाळांना सोई-सुविधा मिळत आहेत. वस्ती शाळांना कायमस्वरूपी वसतिगृहे बांधण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. कायमस्वरूपी वसतिगृहे बांधण्यास परवानगी द्यावी यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आल्याची माहिती साक्षीच्यावेळी समितीस दिली. जिल्हा परिषदेकडून कायमस्वरुपी वसतिगृहे बांधण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. समितीने यासंदर्भात शासनाकडे शिफारस केली पाहिजे. तसेच उस तोड

कामगारांच्या मुलांसाठी कायमस्वरुपी वसतिगृहे बांधण्याबाबत शासनाकडे शिफारस करण्यात येईल असे सांगून त्यांच्यासाठी वेगळा निधी देता येईल काय याचाही विचार होणे गरजेचे आहे असे समितीने साक्षीचे वेळी मत व्यक्त केले, त्यावर बीड जिल्ह्यामध्ये उस तोड कामगारांच्या मुलांना कायमस्वरुपी वसतिगृहाची आवश्यकता आहे व त्यासंदर्भातील पाठपुरावा शासनाकडे सुरु आहे असे विभागीय सचिवांनी साक्षीच्या वेळी समितीस सांगितले, याबाबत समितीने एक ठराव करून शासनाकडे पाठवावा असे समितीने पुढे सांगितले असता सर्व शिक्षा अभियान अंतर्गत वसतिगृहे बांधण्याची तरतूद आहे. गरजेनुसार २० मुलांसाठी वसतिगृहे सुरु केले आहे. यामध्ये वेगवेगळ्या बाबी व निकष आहेत असे विभागीय सचिवांनी समितीस माहिती दिली. वसतिगृहासाठी जो निधी येतो त्यातून भोजनाची व्यवस्था करण्यात येते. कायमस्वरुपी वसतिगृहे बांधण्यासाठी शासनाने निधी उपलब्ध करून दिला पहिजे अशी शिफारस समितीने करावी असे साक्षीच्या वेळी मत व्यक्त केले. बीड जिल्ह्यात सन २००४-२००५ मध्ये १,७५४ विद्यार्थी होते. व सन २००९-२०१० मध्ये ५१,९६६ विद्यार्थी आहेत. विद्यार्थ्यांमध्ये एवढी वाढ कशी काय झाली आहे आणि विद्यार्थ्यांची वाढलेली संख्या विचारात घेवून काय उपाययोजना करण्यात आल्या आहेत, अशी समितीने विचारणा करुन बीड जिल्ह्यातील उस तोड कामगार आठ महिने बाहेर असतात व चार महिने गावात असतात म्हणून त्यांच्यासाठी कायमस्वरुपी वसतिगृहे बांधणे आवश्यक आहे असे समितीने साक्षीच्या वेळी मत प्रतिपादन केले उस तोड कामगारांच्या संदर्भात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चांगले काम केले असल्यामुळे, समितीने, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अभिनंदन केले. तसेच विभागीय सचिवांनी उस तोड कामगारांच्या मुलांसाठी कायमस्वरुपी वसतिगृहाची व्यवस्था करण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय तेथे उपलब्ध नसल्याने मत व्यक्त केले. उस तोड कामगारांच्या मुलांना कायमस्वरुपी वसतिगृहे बांधली तर ती मुले वसतीगृहात राहतील काय, अशी समितीने विचारणा करुन उस कारखाने व त्यांच्या परिसरात कामगारांच्या मुलांसाठी शाळा काढतात, त्यामुळे जिल्हा परिषदेने या मुलांसाठी शाळा सुरू केल्यास उस कारखानदार शाळा काढणार नाहीत. या सर्व गोष्टींचा विचार करावा लागेल. असे समितीने सांगून साक्षीच्या वेळी चर्चेधीन सर्व मुद्यांची माहिती घेवून समिती शासनाकडे शिफारस करील असे समितीने साक्षीच्या शेवटी सांगितले.

अभिप्राय व शिफारशी :

बीड जिल्ह्यातील कामगार आठ महिने बाहेर व चार महिने त्यांच्या घरी असतात त्यामुळे कामगारांच्या मुलांसाठी स्वतंत्र वस्तीशाळा चालविण्यात येतात. त्यांच्यासाठी तात्पुरत्या निवास व

भोजनाची व्यवस्था शासनास करावी लागते, कारण त्यांना इतर शाळांप्रमाणे सोईसवलती मिळत नाहीत. **विद्यार्थ्यांची संख्या सन २००४-२००५ मध्ये १,७५४ होती व आता सन २००९-२०१० मध्ये त्यात वाढ होवून ती ५१,९६६ पर्यंत पोहचली आहे.**

सर्व शिक्षा अभियानातंर्गत वसतिगृहे बांधता येवू शकतात वसतिगृहासाठी शासन निधी देते, त्यातून भोजन व्यवस्था करण्यात येते तथापि शासनाने वसतिगृहे बांधण्याची आवश्यकता आहे असे समितीने बैठकीच्या वेळी मत व्यक्त केले आहे व असा प्रस्ताव शासनास पाठविण्यात आला असून त्यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे अशी समितीस माहिती देण्यात आली. बीड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी उस तोडणी कामगारांच्या संदर्भात चांगले काम केलेले असल्याने समितीने त्याची दखल घेवून साक्षीच्या वेळी त्यांचे अभिनंदन केले.

सन २००४-२००५ मध्ये १,७५४ उस तोडणी कामगारांची मुले वसतिगृहात शिकत होती व सन २००९-२०१० मध्ये त्यात वाढ होवून ती संख्या ५१,९६६ वर गेली आहे ही एवढी वाढ अचानक कशी झ ाली याचा आढावा बीड जिल्हा परिषदेने घेवून अशा मुलांसाठी कायम स्वरुपी वसतिगृहे बांधणे आवश्यक आहे. तथापि, अशी सुविधा दिल्यास त्याचा फायदा ते विद्यार्थी पुर्णपणे घेतील काय, याचाही गांभिर्याने विचार करणे गरजेचे आहे असे समितीचे मत आहे.

सबब, बीड जिल्ह्यातील उस तोड कामगारांच्या मुलांना कायमस्वरुपी वसतिगृहाची सुविधा देण्याबाबत शासनाने आवश्यक असलेला निधी उपलब्ध करून द्यावा अशी समिती शासनास शिफारस करीत आहे.

समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस दोन महिन्याच्या आत पुरविण्यात यावी अशीही शिफारस समिती शासनास करीत आहे.

परिशिष्ट
समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कर्यवृत्त

गुरुवार, दिनांक २९ सप्टेंबर, २००८
स्थळ : जिल्हापरिषद सभागृह, अकोला

उपस्थिती

१. श्री.सुभाष ठाकरे, वि.स.स.समिती प्रमुख

२. श्री.रमेशभाई कदम, वि.स.स.

३. श्री.माणिकराव जगताप, वि.स.स.

४ श्री.संपतराव अवघडे, वि.स.स.

५ श्री.श्रीनिवास देशमुख (गोरठेकर), वि.स.स.

६ श्री.डी.एस.अहिरे, वि.स.स.

७ श्री.आशिष जयस्वाल, वि.स.स.

८ श्री.अण्णासाहेब माने-पाटील, वि.स.स.

९ श्रीमती अनुसया खेडकर, वि.स.स.

१० श्री.पी.टी.कांबळे, वि.स.स.

११ श्री.हेमंत पटले, वि.स.स.

१२ श्री.राजन तेली, वि.प.स.

१३ श्री.एम.एम.शेख, वि.प.स.

१४ श्री.विक्रम वसंतराव काळे, वि.प.स.

१५ श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

श्री.वि.वा.देशमुख, उप सचिव
श्री.ता.ना.मिसाळ, अवर सचिव
श्री.एस.पी.गायकवाड, कक्ष अधिकारी
श्री.सुभाष नलावडे, कक्ष अधिकारी

ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई

श्री.ए.एस.मोरे, उप सचिव
श्री.कृ.शं.कांबळे, अवर सचिव

मुख्य लेखा परिक्षक स्थानिक निधी (लेखा) :

श्री.अ.बा.सावंत, मुख्य लेखा परिक्षक

अकोला जिल्हापरिषदचे अधिकारी :-

१. श्री.नितिनकुमार खाडे, मुख्य कार्यकारी अधिकारी

२. श्री.चंद्रकांत गुडेवार, अति मुख्य कार्यकारी अधिकारी

३. श्री.वा.वा.खर्चे, मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी

४. डॉ.कमलकिशोर फुटाणे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)

५. डॉ.जी.के.रचकुंटवार, जिल्हा आरोग्य अधिकारी

६. श्री.एस.जी.जवंजाळ, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण

७. श्रीमती.यु.डी.उयबरहांडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन)

८. श्री.एम.सी.जुमडे, शिक्षणाधिकारी (माध्य)

९. श्री.प्रकाश जाधव, शिक्षणाधिकारी (प्राथ)

१०. श्री.दि.बु.पाटील, कार्यकारी अभियंता (बांधकाम)

११. श्री.जी.बी.बेहळे, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा

१२. श्री.एस.बी.बांबळ, कृषी विकास अधिकारी

१३. श्री.शरद सोनावणे, प्रभारी कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग

१४. श्री.एस.एम.कापुलवार, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग

संक्षिप्त कार्यवृत्त :

समितीने अकोला जिल्हापरिषदेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी यांची सन २००४-२००५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या प्रश्नावली क्रमांक १ च्या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक २१ ऑक्टोबर, २००८
स्थळ : जिल्हापरिषद सभागृह, वाशिम

उपस्थिती

१. श्री.राजन पाटील, वि.स.स तथा समिती प्रमुख

२. श्रीमती अनुसया खेडकर, वि.स.स.

३. श्री.विष्णू सवरा, वि.स.स.

४. श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव

ग्रामविकास विभाग, मंत्रालय

श्री.एस.मोरे,उप सचिव

वाशिम जिल्हापरिषदचे अधिकारी :-

१. श्री.विठ्ठल बेलखेडे, गट विकास अधिकारी.

२. श्री.पवार, बालविकास प्रकल्प अधिकरी, पं.स.कारंजा

३. श्री.आर.के.वानखेडे, गट शिक्षणाधिकारी, पं.स.कारंजा

संक्षिप्त कार्यवृत्त :

समितीने वाशिम जिल्हापरिषदेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी यांची सन २००४-२००५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या प्रश्नावली क्रमांक १ च्या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांची साक्ष घेतली.

सोमवार, दिनांक १८ नोव्हेंबर, २००८
स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, बीड

उपस्थिती

१. श्री.सुभाष ठाकरे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री.नाना पंचबुद्धे, वि.स.स.

३. श्री.माणिकराव जगताप, वि.स.स.

४. श्री.संपतराव अवघडे, वि.स.स.

५. श्री.आशिष जयस्वाल, वि.स.स.

६. श्री.तुकाराम सुर्वे, वि.स.स.

७. श्री.अण्णासाहेब माने-पाटील, वि.स.स.

८. श्रीमती अनुसया खेडकर, वि.स.स.

९. श्री.पी.टी.कांबळे, वि.स.स.

१०. श्री.विष्णू सवरा, वि.स.स.

११. श्री.राजन तेली, वि.प.स.

१२. श्री.एम.एम.शेख, वि.प.स.

१३. श्री.विक्रम वसंतराव काळे, वि.प.स.

१४. श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

१५. श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
श्री.वि.वा.देशमुख, उप सचिव

ग्रामविकास विभाग, मंत्रालय
श्री.मोरे, उप सचिव
श्री.कांबळे, अवर सचिव

मुख्य लेखापरीक्षक स्थानिक निधी (लेखा), नवी मुंबई
श्री.सावंत, मुख्य लेखा परिक्षक

बीड जिल्हा परिषदेचे अधिकारी

१. श्री.विरेंद्र सिंह, मुख्य कार्यकारी अधिकारी
२. श्री.ता.वा.कोहिनकर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
३. श्री.धनराज वै.निला, उप मुख्य कार्यकारी अधिकारी
४. श्री.आर.आर.भारती, उप मुख्य कार्यकारी अधिकारी
५. श्री.संभाजी भगवंतराव लांगोरे, प्रकल्प संचालक

६. श्री.डी.डी.पवार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
७. श्री.एम.आर.खवस, कार्यकारी अभियंता (बांधकाम)
८. श्री.एल.जी.जांभळे, कार्यकारी अभियंता (बांधकाम)-२
९. श्री.आय.ई.इनामदार, कार्यकारी अभियंता लघुपाटबंधारे
१०. श्री.रमेश ढवळे, कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा
११. डॉ.बी.जी.चव्हाण, जिल्हा आरोग्य अधिकारी
१२. श्री.पी.के.जाधव, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
१३. श्री.डी.टी.सोनावणे, शिक्षण अधिकारी (माध्यमिक)
१४. श्री.व्ही.एस.मिसाळ, कृषी विकास अधिकारी
१५. डॉ.पी.एम.कांबळे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

संक्षिप्त कार्यवृत्त :

समितीने बीड जिल्हापरिषदेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी यांची सन २००४-२००५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या प्रश्नावली क्रमांक १ च्या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक २६ ऑक्टोबर, २०१०
स्थळ : विधान भवन मुंबई

उ **प स्थि ती**

१. श्री. बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. ॲड, के.सी.पाडवी, वि.स.स.

३. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

४. श्री. खुशाल बोपचे, वि.स.स.

५. श्री. सुरेश खाडे, वि.स.स.

६. श्री. चंद्रशेखर बावनकुळे, वि.स.स.

७. श्री. विष्णू सावरा, वि.स.स.

८. श्री. नितीन भोसले, वि.स.स.

९. ॲड. उषा दराडे, वि.प.स.

१०.

महाराष्ट्र **विधानमंडळ सचिवालय**
श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
श्री. विलास गो.आठवले, अवर सचिव

मुख्य लेखापरिक्षक स्थानिक निधी (लेखा)
श्री. प्र.वा.पांढरीपांडे,

ग्रामविकास **विभाग**

१. श्री.प्रकाश हिर्लेकर, सह सचिव
२. डॉ.मालिनाथ कलशेट्टी, उप सचिव

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

१. श्री.डी.सा.सुर्यवंशी, विशेष कार्य अधिकारी व मुख्य अभियंता

कृषी व पदुम विभाग

१. श्री.आ.ब.रामटेके, उप सचिव

वित्त विभाग

१.श्री.रमेश अग्रवाल, सचिव

जिल्हा परिषद, अकोला

(१) श्री.अर्जून वाजे, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी
(२) श्री.बि.व्यं.तांबडे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

संक्षिप्त कार्यवृत्त :

सन २००४-२००५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात अकोला जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी ग्रामविकास विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, कृषी व पदुम विभाग, वित्त विभागाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

बुधवार **दिनांक २७ ऑक्टोबर, २०१०**
स्थळः विधान भवन, मुंबई.

उपस्थिती

१) श्री.बबनराव शिंदे, वि.स.स. समिती प्रमुख

२) श्री. भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

३) श्री. बापुसाहेब पठारे, वि.स.स.

४) श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

५) श्री.खुशाल बोपचे, वि.स.स.

६) श्री.सुरेश खाडे, वि.स.स.

७) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय -
श्री.भा.ना.कांबळे - सह सचिव.

मुख्यलेखा परीक्षक, स्थानिक निधी (लेखा)
श्री. प्र.वा.पांढरीपांडे,

ग्रामविकास व जलसंधारण विभाग
श्री.सुधीर ठाकरे, सचिव

नियोजन (रोहयो/ग्रामविकास व जलसंधारण विभाग)
श्री.गिरिराज, सचिव

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, विभाग
श्री.सतीश गवई, प्रधान सचिव

शालेय शिक्षण विभाग
श्री.संजय कुमार, प्रधान सचिव

कृषि व पदुम
श्री.अनिल डिग्गीकर, सचिव

जिल्हा परिषद, वाशिम

श्री.जे.एस.माळाकोळीकर, मुख्य कार्यकारी अधिकारी
डॉ.सुभाष पवार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

संक्षिप्त कार्यवृत्त :

सन २००४-२००५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात वाशिम जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्याच्या दृष्टीने ग्रामविकास व जलसंधारण विभाग, नियोजन (रोहयो/ग्रामविकास व जलसंधारण विभाग), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शालेय शिक्षण विभाग, कृषि व पदुम विभागाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

बुधवार दिनांक १० नोव्हेंबर, २०१०
स्थळ : विधान भवन,मुंबई

उपस्थिती

१) श्री.बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२) श्री. माधवराव पवार, वि.स.स.
३) श्री.भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.
४) श्री. खुशाल बोपचे, वि.स.स.
५) श्री.सुरेश नवले, वि.स.स.
६) ॲड.उषा दराडे, वि.प.स.
७) श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
श्री.भा.ना.कांबळे, सह सचिव,
श्री.विलास आठवले, अवर सचिव

मुख्य लेखा परीक्षक स्थानिक निधी (लेखा)
श्री.के.एम.विधाते

शालेय शिक्षण व क्रिडा विभाग
श्री.संजीवकुमार, प्रधान सचिव

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
श्रीमती मालिनी शंकर, प्रधान सचवि

रोहयो व जलसंधारण विभाग
श्री.व्ही.गिरिराज, प्रधान सचिव

ग्रामविकास विभाग
श्री.सुधीर ठाकरे, सचिव

नियोजन विभाग
श्री.मोरे, उप सचिव

जिल्हा परिषद, बीड
श्री.नितीन खाडे, मुख्य कार्यकारी अधिकारी

संक्षिप्त कार्यवृत्त :

सन २००४-२००५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात बीड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे बैठकीच्या वेळी उपस्थित झालेल्या मुद्यांवर अधिक माहितीमिळविण्याच्या दृष्टीने शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, रोहयो व जलसंधारण विभाग, ग्रामविकास विभाग, नियोजन विभागाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

दिनांक - १८ एप्रिल, २०११
स्थळ : विधान भवन, मुंबई

उपस्थिती

१. श्री. बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

३. श्री. खुशाल बोपचे, वि.स.स.

४. श्री. सुरेश खाडे, वि.स.स

५. श्री. विष्णू सावरा, वि.स.स.

६. श्री. अनिल भैय्या राठोड, वि.स.स.

७. ॲड. उषा दराडे, वि.प.स.

८. श्री. सय्यद पाशा पटेल, वि.प.स.

९. श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
श्री.भा.ना.कांबळे, सह सचिव.
श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव.
श्री.प्र.स.मयेकर, कक्ष अधिकारी.
श्री.सुभाष नलावडे, कक्ष अधिकारी.

संक्षिप्त कार्यवृत्त

समितीने बैठकीत समितीच्या सहाव्या अहवालाच्या प्रारुपावर विचार करुन ते किरकोळ सुधारणासह संमत केले.